# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण २४, १९३७ ( शके )**

**(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९४**

---

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी तसेच शासकीय कर्मचारी यांना जातीचे दाखले मिळण्यास होत असलेला विलंब**

**(१) * ११९३८ श्री.विजय गिरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनंत गाडगीळ, श्री.रामराव वडकुते, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ मे, १९६० पूर्वीपासून ज्या व्यक्तींचा स्थायी निवास महाराष्ट्रात आहे त्यांना १९५० पूर्वीचा दाखला सादर करण्याबाबतची अट लागू राहणार नाही कारण ते अविभाजीत मुंबई प्रातांचे निवासी होते असे शासनाचे परिपत्रक क्र.सीबीसी-२०१४/प्र.क्र.२६४/भावक-५ दिनांक ९ सप्टेंबर, २००४ अन्वये घोषित केले असताना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र आवश्यक असल्यास संबंधित विभागाकडून १९५० पूर्वीच्या महाराष्ट्रात स्थायी निवास असल्याचा दाखला पुराव्यासह सादर करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थी तसेच शासकीय कर्मचारी यांना वेळेवर जातीचे दाखले मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षणापासून वंचित रहावे लागत असून शासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय इत्यादी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शहरी ग्रामीण विद्यार्थांसाठी वेगवेगळ्या स्वरुपाचे निर्णय घेतल्याने मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह विविध शहरांमध्ये शिक्षणासाठी आलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे जमवून संबंधित समाज कल्याण विभागात सादर करण्याची व त्याचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी यापूर्वी महाविद्यालयांना देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच उपरोक्त जात प्रमाणपत्र मिळण्याच्यादृष्टीने शासनाने समित्या स्थापन केल्या आहेत काय व केव्हा तसेच या समित्यांमार्फत किती जिल्ह्यात व किती व्यक्तिंना जातनिहाय प्रमाणपत्र देण्यात आले आहे,

(६) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थी व शासकीय कर्मचारी यांना विनाविलंब जातीचे दाखले मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(४) हे खरे आहे.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ अंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. सदर नियमांनुसार जातपडताळणीचे कामकाज करण्यात येते. त्यानुसार जातीदावा सिध्द करण्याची जबाबदारी संबंधितांची आहे.

(५) सद्य:स्थितीमध्ये राज्यात १५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचा कामाचा व्याप विचारात घेऊन समित्यांचे कामकाज प्रभावीपणे व्हावे, याकरीता प्रत्येक जिल्ह्याकरिता स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(६) प्रलंबित प्रकरणांची संख्या व अपुरा कर्मचारीवर्ग यांचा समन्वय साधून तसेच अतिरिक्त कार्यभार देऊन व वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जिल्ह्यातील एका गावाचा स्मार्ट दलित गाव म्हणून विकास करण्याबाबत**

**(२) * १२५११ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्ह्यातील एका गावाचा स्मार्ट दलित गाव म्हणून विकास करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, ही योजना केंव्हा अंमलात आणण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे. या विभागाने दिनांक ९.१०.२०१५ च्या शासन निर्णयाव्दारे निवडक वस्तीचा सर्वकष विकासाची योजना तयार करुन कार्यान्वित करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) योजना प्रगतीपथावर आहे.

-----------------

**राज्यातील विशेषत: पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत होत असलेल्या लैगिंक अत्याचाराबाबत**

**(३) * ११९५८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: पांढुर्णा (जि.वर्धा) येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील एका अल्पवयीन मुलींवर लैगिंक अत्याचार झाला असून रायगड येथील आश्रमशाळांमध्येदेखील अनेक अत्याचार होत असल्याचे तसेच १३ आश्रमशाळा बेकायदा सुरु करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पांढुर्णा तसेच रायगड जिल्ह्यातील बेकायदा आश्रमशाळांवर व संबधित दोषींवर शासनाने तसेच जिल्हा प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासकीय आदिवासी आश्रमशाळा पांढुर्णा (जि.वर्धा) येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाला आहे हे खरे आहे. तथापि रायगड जिल्ह्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांत अशा प्रकारची घटना घडलेली नाही. तसेच वर्धा व रायगड जिल्ह्यात बेकायदा आश्रमशाळा सुरू नाहीत.

(२) होय, या प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांच्या कार्यालयाने चौकशी केली आहे. सदर चौकशीत शासकीय आदिवासी आश्रमशाळा पांढुर्णा येथील मुख्याध्यापक, अधिक्षक व अधिक्षिका यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे दिसुन आले आहे.

(३) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांनी शासकीय आदिवासी आश्रमशाळा पांढुर्णा येथील मुख्याध्यापक, अधिक्षक व अधिक्षिका यांना निलंबित केले आहे. तसेच आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर घटनेचा पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यातील आश्रमशाळातील शिक्षकांना विनाविलंब वेतन देण्याबाबत**

**(४) * १२६९९ श्री.महादेव जानकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळांना शाळा सुरू झाल्यापासून शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात आले नसल्याने सदर शाळांमधील १४ हजारांपैकी ५ हजार शिक्षकांना जुलै-ऑगस्ट, २०१५ चे वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळांना शासनाकडून अनुदान देण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर आश्रमशाळांना किती दिवसांत अनुदान देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी योजनेतर रु. २९३.८३ कोटी व योजनांतर्गतसाठी रु. १३०.२० कोटी असा एकूण रु. ४२४.०३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामात अनियमितता झाल्याबाबत**

**(५) * १२५९० श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ५१६९० ला दिनांक ३ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील कामातील अनियमिततेबाबत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे संबंधितांवर कारवाई करणेबाबत अनेक तक्रारी श्री.नंदलाल भट्टड यांना केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश विशेष लेखापरिक्षक वर्ग २, फिरते पथक, सहकारी संस्था, बुलढाणा यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशी अहवालात तथ्य निदर्शनास आल्याप्रमाणे तक्रारीतल्या मुद्यांवर तत्कालीन संचालक मंडळ सदस्य व तत्कालीन सचिव यांचेवर कृषी उत्पन्न बाजार समिती खामगांवची आर्थिक नुकसानाची जबाबदारी निश्चित करणेसाठी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खामगांव यांची नियुक्ती करुन २ महिन्यांच्या आत जबाबदारी निश्चितीबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित दोषींवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) होय.
(४) व (५) सदर प्रकरणी प्राप्त चौकशी अहवालातील मुद्यांमध्ये तथ्य असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधितांविरुध्द महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे नियम ५३ अन्वये जबाबदारी निश्चित करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

**उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी करुन उद्योजकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(६) * ११२१२ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मेक इन महाराष्ट्र या अभियानांतर्गत उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी करण्याबरोबरच उद्योजकांना ऑनलाईन सेवा जलदगतीने उपलब्ध करुन द्याव्यात असा आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशानुसार उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.

(२) “मेक इन महाराष्ट्र” या उपक्रमाच्या अंतर्गत पाठपुराव्याअंती राज्य शासनाने खालील उल्लेखनीय प्रगती केली आहे.

१) राज्यात उद्योग स्थापन करण्याच्या प्रक्रियेमध्ये घटकाची गुंतवणूक, उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे ठिकाण इत्यादीच्या आधारे ढोबळमानाने ६४ ते ६६ परवाने लागत असत, आता सुलभीकरणांतर्गत त्यांची संख्या ही ४८ ते ४६ इतकी करण्यात आली आहे. ऑटो उद्योगांना एमआयडीसी क्षेत्रात ३७ व एमआयडीसी क्षेत्राबाहेरील जागेवर ४२ परवाने लागत आहेत. तसेच स्टील उद्योगांनाही अनुक्रमे ४१ व ४६ परवाने लागत आहेत.

२) ऊर्जा विभागाकडून देण्यात येणारी विद्युत जोडणी परवाना देण्यासाठी लागणाऱ्या मंजुऱ्यांची संख्या ७ वरुन ३ इतकी कमी केली असून सदरची परवानगी देण्यासाठीचा कालावधी ६७ दिवसांवरुन १५ इतका कमी केला आहे व रस्ता न ओलांडता द्यावयाच्या विद्युत जोडणी परवान्याचा कालावधी ७ दिवस इतका कमी केला आहे.

३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या परवानग्यांची संख्या १४ वरुन ५ इतकी कमी केली आहे.

४) २० हजार चौ.मी. पेक्षा जास्त बांधकाम असणाऱ्या औद्योगिक बांधकामासाठी पर्यावरण विभागाच्या ना-हरकतीची आवश्यकता असणार नाही.

५) नदी नियमन धोरण फेब्रुवारी २०१५ पासून रद्द करण्यात आले आहे.

६) उद्योगांना मुंबई प्राधिकरण विभागामध्ये स्थान निश्चयन धोरणाअंतर्गत लागणारे “ना हरकत प्रमाणपत्र” प्राप्त करण्याची प्रक्रिया शासनाने संपुष्टात आणली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पुणे येथील रुपी सहकारी बँकेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत

**(७) * ११४८१ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे सात लाखापेक्षा जास्त ठेवीदार असणाऱ्या पुणे येथील रुपी सहकारी बँकेमध्ये आर्थिक अनियमितता झाल्यामुळे सुमारे तीन वर्षापासून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली असून या संदर्भात दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी रिझर्व बँक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी, सहकार विभागाचे अधिकारी व इतर संबंधित यांची बैठक आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची वस्तुस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त ठेवीदारांचे हित जपण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे,

या बँकेसंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०३.२०१५ रोजी बैठक झाली आहे.

(२) व (३) रिझर्व्ह बँकेने हार्डशिप केसेस प्रकरणी रुपी बँकेचे प्रशासकीय मंडळाच्या स्तरावर निर्णय घेण्याची परवानगी दिल्यामुळे अडचणीतील ठेवीदारांना जलद गतीने ठेवी परत केल्या जात आहेत. रुपी बँकेसाठी विशेष एक रकमी कर्ज परतफेड योजना राबविली जात असून विलीनीकरण सुलभ होण्यासाठी स्वेच्छानिवृत्ती योजना लागु केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर विभागातील आदिवासी विकास विभागात झालेला गैरव्यवहार**

**(८) * १११७९ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय व आदिवासी आश्रमशाळेत धान्य, अंडी, दुध, केळी, नाचनी हा पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असून यासाठी काढलेल्या निविदांमध्ये उक्त वस्तूंच्या दरात तफावत असून गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

अपर आयुक्त, नागपूर स्तरावर दुध अंडी केळीची ई-निविदा दोन वेळा प्रसिध्द करुनही अल्प प्रतिसाद मिळाल्याने रद्द करण्यात आली. तसेच इतर अपर आयुक्त, यांच्या ई-निविदेतील अटी शर्ती प्रमाणे सुधारणा करुन फेर निविदा दिनांक ३१/१०/२०१५ रोजी प्रसिध्द केली. दि. २६/११/२०१५ रोजी व्यापारी लिफाफा उघडण्यात आला असून निविदेबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे. अन्नधान्याच्या निविदेस वित्तीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या अनियमिततेबाबत

**(९) * ११७७९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ७२६६ ला दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, श्री.सोलनकर यांनी नियमबाहयरित्या हेड बदलून तसेच एस.आर.च्या कामांची बीले सीआर मध्ये काढणे, सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात खर्च केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र व विवरण देण्यास दिरंगाई करुन सुमारे पाच कोटी रुपयांचा गैरप्रकार, आर्थिक अनियमितता केल्याबाबत त्यांच्याविरुध्द येथील पत्रकाराने अप्पर मुख्य सचिव, (सां.बा) विभाग यांच्याकडे माहे मे-जून, २०१५ दरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.सोलनकर यांच्याकडून अनियमितता झालेल्या पाच कोटी रुपयांची वसुली करणे तसेच तक्रार अर्जाप्रमाणे त्यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रार अर्जाप्रमाणे मुद्दे निहाय व सविस्तर चौकशी करुन दोषीविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) श्री.एस.बी.सोलनकर, कार्यकारी अभियंता यांना लेखाशीर्षामध्ये अधिकचा खर्च करणे यासह अन्य अनियमिततेच्या अनुषंगाने शासन आदेश, दिनांक ११.०८.२०१५ अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच या प्रकरणी झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने श्री.सोलनकर यांच्याविरुध्द दिनांक ०६.११.२०१५ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील नॉन क्रिमीलेअर (प्रगत उन्नत) प्रवर्गाची उत्पन्न मर्यादा रु.४.५० लाखावरून ६ लाखापर्यंत करण्याबाबत**

**(१०) * १२६०८ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्यातील मॅट्रीकोत्तर शैक्षणिक प्रवेश व प्रतिपूर्तीसाठी इतर मागासवर्ग/विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रु. ४.५० लाखावरुन रु. ६.०० लाख करण्यात येईल असे आश्वासन मार्च, २०१५ व जुलै, २०१५ च्या अधिवेशनात मा. मंत्री महोद्यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णय केव्हा निर्गमित करण्यात आला वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी रु. ४.५० लाखाची उत्पन्न मर्यादा रु. ६ लाख करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

(२) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषत: आटगाव-आसनगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील लघु-उद्‌योगांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(११) * ११७४७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.महादेव जानकर, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.विजय गिरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्‌योगांसाठी पायाभूत व अन्य सुविधांचा असलेला अभाव, पाणी टंचाई, वीज टंचाई तसेच चुकीचे धोरण राबविल्याने अनेक उद्‌योग अन्य राज्यात गेले आहेत तर विविध अडचणीमुळे राज्यातील लघु आणि मध्यम असे सुमारे ७२ हजार ५८७ उद्‌योगधंदे बंद पडून ३ लाख कामगार बेरोजगार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील आटगाव-आसनगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील १० हजार लघु उद्‌योग देखील गुजरात राज्यात स्थलांतरील झाल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच दुष्काळ व पाण्याअभावी अनेक उद्‌योग पुढच्या पावसाळ्यापर्यंत बंद ठेवावे लागण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे अव्वल स्थानांवर असलेला महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, झारखंड, छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान आणि ओडिसा या राज्यांना पिछाडीवर टाकत आठव्या स्थानांवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बंद पडलेले कारखाने विनाविलंब पूर्ववत सुरु होण्याच्या दृष्टीने व बंद पडण्याची प्रक्रिया तातडीने थांबवून सदर उद्‌योगांना पुनरुज्जीवन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) नाही,

उद्योग संचालनालयाच्या जिल्हास्तरावरील अभिलेख्यानुसार सन २००८ मध्ये करण्यात आलेल्या ४ थ्या औद्योगिक प्रगणेच्या अहवालानुसार राज्यामध्ये ३०५५२ लघु उद्योग व ७०६८ बंद पडलेले आहेत.

(२) नाही.

(३) राज्यात उद्योग घटक पाण्याअभावी बंद आहेत, असे निदर्शनास आलेले नाही.

कैंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयातील डिपार्टमेट ऑफ इंडस्ट्रीयल पॉलीसी अँड प्रमोशन (डीआयपीपी) या विभागाने ईज ऑफ डुईंग बिझीनेस संदर्भात भारतातील सर्व राज्यांचे गुणांकन केले व त्यात महाराष्ट्राचा आठवा क्रमांक दर्शविला आहे. मात्र हे गुणांकन कसे काढले या विषयी राज्य सरकारने कैंद्र शासनास आपले म्हणणे मांडले आहे.

(४) बंद कारखाने पुर्ववत सुरु होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी शासन निर्णय दिनांक १४/०८/२०१४ अन्वये "विशेष अभय योजना" लागू करण्यात आली होती व त्यास दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती. सदर कालावधीत या योजनेचा लाभ राज्यात एकूण २१८ व ठाणे जिल्ह्यातील एकूण ०४ उद्योग घटकांनी लाभ घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील पं.वसंतराव देशपांडे सभागृहाच्या दुरवस्थेबाबत

**(१२) * ११०२८ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सांस्कृतिक चळवळीकरीता बांधलेल्या पं.वसंतराव देशपांडे सभागृहाचे व्यवस्थापन कोणाकडे आहे,

(२) असल्यास, या सभागृहातील आसने तुटलेली असून बसण्यायोग्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सभागृहाचे बुकींग कोणामार्फत होते व कोणत्या नियमावलीनुसार करण्यात येते, सांस्कृतिक कार्यक्रम, मराठी नाटके या करिता कमी दरात सदर सभागृह उपलब्ध करून द्यावे अशी मागणी नागरीकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या नाटकांचे दर मुंबईला रु. २००/- असतात तेच दर नागपूरला रु. ५००/- आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर नाट्यगृह सांस्कृतिक नाट्य चळवळ अशाच कार्यक्रमांना उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधान्य देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नागपूर येथील सांस्कृतिक चळवळीकरीता बांधलेल्या पं. वसंतराव देशपांडे सभागृहाचे व्यवस्थापन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ नागपूर कडे आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, काही आसने नादुरुस्त होती ती दुरुस्त करण्यात आलेली आहे.

(३) सभागृहाचे बुकींग सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, नागपूर कडून करण्यात येत असून सद्यस्थितीत शासन मंजुरीप्रमाणे ३ तासाचे एका स्लॉटकरीता सर्वसाधारण भाडे रु. ११,५४०/- आकारण्यात येते व शास्त्रीय संगीत, बालनाट्य प्रयोगाकरीता सवलतीच्या दराने रु. ८,१२०/- भाडे आकारण्यात येते.

सांस्कृतिक कार्यक्रम, मराठी नाटके या करिता कमी दरात सदर सभागृह उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी नागरीकांकडून करण्यात येत आहे.

(४) नाट्य/सांस्कृतिक कार्यक्रमाचे दर हे संबंधीत आयोजन संस्थेकडून आकारण्यात येत असल्याने त्यावर नियंत्रण नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील घर खरेदी करुन त्याचे स्मारकामध्ये रुपांतर करण्याबाबत

**(१३) * ११४३१ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लंडनमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य राहिलेली वास्तू खरेदी करण्यासाठी दिनांक ३/२/२०१५ रोजी शासनाने निर्णय घेऊन ४० कोटी रुपयांची पुरवणी मागणीत तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तरतुदीतून सदर वास्तू शासनाने खरेदी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर वास्तूचे स्मारकात रुपांतर करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) सदर वास्तू आकस्मितता निधीतून अग्रीम घेऊन खरेदी करण्यात आलेली असून त्या अग्रीमाची प्रतिपुर्ती पुरवणी मागणीद्वारे करण्यात येत आहे.
(३) याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील लाखो अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(१४) * ११९९६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.विजय गिरकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार २९ लाख अपंग असून फक्त अडीच लाख अपंगांकडे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील ५२ टक्के अपंगाच्या बाबतीत सर्व क्षेत्रात भेदभाव केला जात असून ६१ टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्याचे, ५० टक्के सार्वजनिक ठिकाणी अपंगाना सोईचे इन्फ्रास्ट्रक्चर नसल्याचे तसेच ५१ टक्के सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आवश्यक त्या सुविधा अपंगाना नसल्याचे झेविअर्सच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) तसेच अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता राज्यात एकच केंद्र असून अपंगांच्या समस्या जाणून घेण्यासाठी शासनाकडे एकही हेल्पलाईन नसल्याने अपंगांना अनेक वेळा संघर्ष करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपंगांना हेल्पलाईन सुरु करणे, अपंगत्व प्रमाणपत्र मिळण्याकरिता तालुका व प्रभाग पातळीवर केंद्र सुरु करणे, त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्यांना सन्मान मिळण्याकरीता योग्य ती जनजागृती करणे, अपंगांच्या आरक्षित जागा पूर्णपणे भरणे तसेच वाहतूक व्यवस्थेत आवश्यक सुविधा निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय,
(२) हे खरे नाही.

राज्यातील अपंग व्यक्तींना विहित नमुन्यात हस्ताक्षराने अपंगत्व प्रमाणपत्र देण्यात आली आहेत. आरोग्य विभागाने निर्गमित केलेल्या दि.०६.१०.२०१२च्या शासन निर्णयाप्रमाणे दि. ०३.१२.२०१२ पासून संगणकीय प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिली जात आहेत. दि. ०३.१२.२०१२ ते दि. २७.११.२०१५ या कालावधीत एकूण २,३०,५१९ अपंग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. राज्यात विशेष मोहिम राबवून उर्वरित अपंग व्यक्तींना संगणकीय प्रमाणपत्र जलद गतीने उपलब्ध करुन देण्यात येतील.
(३) व (४) अपंगासाठी असलेल्या विविध सोई सुविधांची माहिती व मार्गदर्शन करणे तसेच त्यांना या सुविधा मिळवून देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेतील जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयात व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई व उपनगर येथे अपंग मार्गदर्शन व सल्ला केंद्र कार्यरत आहेत. तसेच महिला, मुले व ज्येष्ठ नागरीकांसाठी असलेली १०३ ही हेल्पलाईन सुविधा अपंगांनाही उपलब्ध करुन देण्याबाबत दि.२७.२.२०१४ च्या पत्रान्वये गृह विभागास विनंती करण्यात आलेली आहे.

अपंगत्वाचे संगणकीय प्रमाणपत्र राज्यातील २३ जिल्हा रुग्णालये, ३ सामान्य रुग्णालये, १५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये तसेच ४ अन्य रुग्णालयातून अशा एकूण ४५ संस्थांमधून वितरीत करण्यात येत असून राज्यात प्रत्येक जिल्हयात १ ते २ उपजिल्हा रुग्णालयाची निवड करुन तेथे अपंगत्वाचे संगणकीय प्रमाणपत्र देण्याची सुविधा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

केंद्र शासनाच्या अपंग अधिनियम, १९९५ ची राज्यात सन १९९६ पासून जशीच्या तशी अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेत अपंगाकरिता एकूण ३ टक्के आरक्षण ठेवण्यात

आलेले आहे. त्यानुसार अंध व क्षीणदृष्टी, अस्थिव्यंग तसेच कर्ण व मुकबधिर या तीन प्रवर्गासाठी प्रत्येकी १ टक्का आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत सरकारी नोकऱ्या व योजनांमध्ये कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.ठाणे) आदिवासी प्रकल्पातंर्गत जव्हारसह मोखाडा, तलासरी, डहाणू, विक्रमगड आणि वाडा या तालुक्यातून विद्यार्थ्यांना इतर तालुक्यातील शाळा व कॉलेजमध्ये पाठविण्यात आल्याबाबत

**(१५) * १२०६१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.ठाणे) आदिवासी प्रकल्पांतर्गत जव्हारसह मोखाडा, तलासरी, डहाणू, विक्रमगड आणि वाडा या तालुक्यातून जवळपास ७५० विद्यार्थ्याना शहापूर, आळंदी, चिखली, आळेफाटा, जुन्नर आणि महाबळेश्वर येथील शाळा तसेच पाचगणी येथील नचिकेत हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉजेलमध्ये पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांपैकी जुन्नरमधील येणेरे येथील इंडियन इंग्लिश स्कूल आणि महाबळेश्वरमधील पाचगणी येथील नचिकेता या शाळेत गेलेल्या पहिलीच्या २० आणि पाचवीच्या ४४ मुलांची राहण्याची व्यवस्था, शौचालये तसेच जेवणाची व्यवस्था नसल्याची मोहंडा (ता.मोखाडा) येथील पालकांनी तक्रार करुन विद्यार्थ्यांना घरी आणले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एका विद्यार्थ्यामागे शासन या शाळांना ५० हजार अनुदान देत असतानाही विद्यार्थ्यांना सुविधा न देता सदर अनुदानाचा अपहार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण योग्य प्रकारे मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले,

(६) तद्‌नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४), (५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेवकी (ता.गेवराई, जि.बीड) येथील खंडूबाबा माध्यमिक विद्‌यालयात शिष्यवृत्ती वाटपात झालेला गैरव्यवहार

**(१६) * ११८३७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ७४८८ ला दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवकी (ता.गेवराई, जि.बीड) येथील खंडूबाबा माध्यमिक विद्‌यालयात सन २००८-२०१३ या कालावधीत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेची रक्कम विद्‌यार्थीनींना वाटप न करता त्याचा अपहार केल्याप्रकरणी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी दिनांक १७ जुलै, २०१३ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना या शाळेविरुध्द कारवाई करण्याची विनंती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गट शिक्षणाधिकारी, गेवराई यांनी केलेल्या चौकशीच्या आधारे प्रकरणातील दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रकरणी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी त्यांच्या कार्यालयात दोषीविरुध्द कारवाईसाठी आवश्यक पुरावे असतानाही संशयास्पद रितीने सुमारे दोन वर्षानंतर दिनांक ७ मे, २०१५ रोजी शाळेला नोटीस देण्याचे कारण काय आहे,
(४) सदर प्रकरणातील दोषींना पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाईची मागणी लोकप्रतिनीधी यांनी दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, सामाजिक न्याय यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास या प्रकरणातील दोषीविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) रेवकी (ता.गेवराई, जि.बीड) येथील खंडूबाबा माध्यमिक विदयालयात सन २००८-०९ ते २०११-१२ या कालावधीत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेची रक्कम विदयार्थीनींना वाटप न करता त्याचा अपहार केल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने गट शिक्षणाधिकारी, गेवराई यांनी केलेल्या चौकशीनुसार सदरील शाळेतील सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटपात अनियमितता झाल्याचे दिसून आले होते. त्यानुसार, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी दि.०८ जुलै, २०१३ रोजी प्रत्यक्ष शाळेस भेट दिली असता संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक रजेवर असल्याचे सांगून शाळेने तपासणीसाठी कोणतेही अभिलेख उपलब्ध करुन दिले नाहीत. म्हणुन संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक व शाळेवर नियमानुसार कार्यवाही करण्याची विनंती सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी दिनांक १७ जुलै, २०१३ च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.बीड यांना केली होती. त्यानुसार, शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.बीड यांनी दि. ०२.०५.२०१५ च्या पत्रान्वये संबंधित शाळेने / मुख्याध्यापकांनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये अपहार केला असल्यास त्यांच्यावर सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांचे कार्यालयाकडून कारवाई होणे गरजेचे आहे, असे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांना कळविले. त्यामुळे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी दि. ०७.०५.२०१५ रोजी शाळेला नोटीस दिली आहे.

(४) होय.

(५) लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २३.०७.२०१५ च्या पत्राच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे, सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बारवी धरणाचे विस्तारीकरण व प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत**

**(१७) * ११२५९ श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ६८६६ ला दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील एमआयडीसीच्या बारवी धरणाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न प्रकल्पग्रस्तांच्या काही मागण्यांमुळे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने प्रकल्पग्रस्तांशी चर्चा करुन बारवी धरणाचा प्रश्न मार्गी लावून धरणाच्या विस्तारीकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) बारावी धरणाच्या नॉन ओव्हर फ्लो (NOF) सेक्शनचे बांधकाम पूर्ण झाले असून, सांडव्यावर दरवाजे बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. परंतु, पुनर्वसनाची कामे काही ग्रामस्थांच्या मागण्यांमुळे अपूर्ण राहिली. तथापि, बारावी धरण प्रकल्पाच्या पुनर्वसनाची कामे प्रगतीपथावर असून प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्याकरीता बारावी धरण विश्रामगृह येथे मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/११/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस लोकप्रतिनिधी तसेच बारावी धरण प्रकल्प पिडीत सेवा संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदरहू बैठकीमध्ये प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सहानुभुतीपुर्वक सोडविण्याचे ठरविण्यात आले असून प्रकल्पास विरोध न करता प्रकल्प पूर्ण करण्याकरीता सर्वतोपरी सहाकार्य करण्याची विनंती प्रकल्पग्रस्तांना करण्यात आली होती. त्यास बारावी धरण प्रकल्प पिडीत सेवा संघ, मुरबाड यांनी सहमती दर्शविली असल्याने बारावी धरण प्रकल्प मे, २०१६ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून, धरणाची पाणी साठवण क्षमता १७८.५८ द.ल.घ.मि. वरुन ३४०.४८ द.ल.घ.मि. इतकी होणार आहे.

-----------------

**कशेडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) घाटात बोगदा तयार करण्याबाबत**

**(१८) * ११२७४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक ७१०८ ला दिनांक १० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कशेडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) घाटात बोगदा करण्याचे प्रस्तावित असले तरी प्रत्यक्षात मात्र याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या प्रक्रियेत ज्या गावांतून हा रस्ता तयार करण्यात येणार आहे त्या गावांतील मोजणी पूर्ण झालेली नसल्याने उक्त महामार्गाचे चौपदरीकरण करण्याकरिता अडसर ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ (जूना राष्ट्रीय महामार्ग क्र.१७) वरील इंदापूर ते झाराप या भागाच्या चौपदरीकरणाकरीता केंद्र शासनाने तत्वत: मंजूरी दिली आहे. या चौपदरीकरणाच्या प्रकल्पात कशेडी येथील १.७२ कि.मी. लांबीचा बोगदा प्रस्तावित आहे. प्रस्तावित बोगद्याची पोचमार्गासह एकुण लांबी ९ कि.मी. असून त्या करीता लागणाऱ्या भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. कशेडी येथील पोचमार्ग व बोगद्याकरीता रायगड जिल्ह्यातील ९ गावे व रत्नागिरी जिल्ह्यातील २ गावे अशा एकूण ११ गावांपैकी रायगड जिल्ह्यातील ९ गावांमधील भूसंपादनाकरीता संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून उर्वरीत २ गावांची संयुक्त मोजणी प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुल, राजुरा, कोरपणा, जिवती व गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) या तालुक्यात आदिवासी वस्तीगृहांतील बंद असलेले जनरेटर व सोलर हिटर सुरु करण्याबाबत**

**(१९) * ११०९८ श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८५ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुल, राजुरा, कोरपणा, जिवती व गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) या तालुक्यात आदिवासी वस्तीगृहांतील मुलांना सोयी सुविधेसाठी रुपये १० लक्ष खर्च करुन पुरविण्यात आलेले जनरेटर बंद असल्याने तसेच तेथील आश्रम शाळेतील मुलांना गरम पाणी मिळावे या उद्देशाने पुरविण्यात आलेले सोलर हिटर मागील ३ वर्षापासून जोडणी न केल्यामुळे पडून असल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जनरेटर दुरुस्तीकरीता शासन केव्हा निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,

(३) तसेच सोलर हिटर पुरविण्यांत येवूनही सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, बंद असलेले जनरेटर व सोलर हिटर सुरु करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयातील मुल, राजुरा, कोरपणा, जिवती व गोंडपिंपरी या तालुक्यातील १३ वसतीगृहांपैकी ३ वसतीगृहांमध्ये जनरेटर पुरविण्यात आले असून नवीन बॅटरी बदलविणे व दुरुस्तीबाबत प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांचेस्तरावर जनरेटर दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे. तसेच उपरोक्त तालुक्यांमधील ९ आश्रमशाळांपैकी ७ आश्रमशाळांमध्ये सोलर वॉटर हिटर कार्यान्वित करण्यात आलेले असून सोलर वॉटर हिटर संच वादळी पावसामुळे तुटफुट झाल्यामुळे, काचेचे प्लेट फुटल्यामुळे, विद्युत खांब पडल्यामुळे, पाण्याच्या टाक्या विस्कळीत झाल्यामुळे बंद स्थितीत आहेत. उर्वरित २ आश्रमशाळांमध्ये वॉटर हिटर संच कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) बंद असलेले जनरेटर सुरु करण्याबाबत प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांचेस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. तसेच याप्रकरणी शासनाने एक सदस्यीय चौकशी समिती नेमली असून समितीमार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लमाण समाजाच्या वस्त्यांचा विकास होण्यासाठी तांडा सुधार योजना राबविण्याबाबत

**(२०) * ११३६८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने लमाण समाजाच्या तांड्याचा विकास होण्यासाठी स्वतंत्ररित्या तांडा सुधार योजना तयार केली असून त्यांना भटक्यांच्या वस्त्यांच्या विकासासाठी यावर्षी शासनाने अवघ्या रुपये १ कोटी ७५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीच्या वाटपासाठी राज्याच्या सहा महसूल विभागांनी नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

सन २०१५-१६ करिता या योजनेकरिता रु.२१ कोटी रक्कम अर्थसंकल्पित केली असून सप्टेंबर, २०१५ अखेर रु.३ कोटी ५० लाख इतकी तरतूद संगणक वितरण प्रणालीद्वारे वितरीत केली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऊस उत्पादकांची एफआरपीची रक्कम देण्यासाठी शासनाने साखर कारखान्यांना कर्जे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२१) * ११५८५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादकांची एफआरपी ची रक्कम देण्यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेले कर्ज देण्यास बँकानी नकार दर्शविला आहे, परिणामी ऊसाची थकीत बिले मिळण्यास अडचणी निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक मंडळाने व्यक्तीगत थक हमी दिल्याशिवाय कर्ज देणार नाही अशी बँक व्यवस्थापनाची भूमिका आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीयकृत बँकाच्या भूमिकेनुसार निर्णय घेवून साखर कारखान्यांना कर्जे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या योजनेनुसार शेतक-यांची एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी राज्यातील १२३ साखर कारखान्यांना रु. १५७२.०४ कोटी इतके कर्ज मंजूर झाले असून त्यापैकी रु. १५६१.०२ कोटी इतक्या रकमेचे वितरण झाले आहे. तसेच राज्य शासन जाहीर सॉफ्ट लोन योजनेनुसार राज्यातील ७ साखर कारखान्यांना रु. ७२.३८ कोटी इतके कर्ज मंजूर झाले असून त्यापैकी रु. ६७.३८ कोटी रकमेचे वितरण झाले आहे.

अशाप्रकारे राज्यातील एकूण १३० साखर कारखान्यांना रु. १६४४.४२ कोटी इतके कर्ज मंजूर झाले असून त्यापैकी रु. १६२८.४० कोटी इतक्या रकमेचे वितरण झालेले आहे.

(२) व (३) केंद्र शासन अधिसूचना दिनांक २३/०६/२०१५ व शासन निर्णय दिनांक ३०/०७/२०१५ आणि दिनांक ५/९/२०१५ मध्ये नमूद केल्यानुसार जे साखर कारखाने एन.पी.ए.मध्ये आहेत त्या कारखान्यांच्या कर्ज रकमेस शासन थकहमी मिळाल्यास योजनेचा लाभ घेता येईल. शासन थकहमीबाबत संबंधित अधिसूचना व शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तीच्या आधारे कर्ज रकमेस हमी देण्याची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अनुसूचित जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील शिक्षकांना पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी (बी.एड) लागू करण्याबाबत**

**(२२) * १२४६६ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हापरिषद व खाजगी प्राथमिक शाळेतील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांना प्रशिक्षित समजून नियुक्ती दिनांकापासून त्यांना पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी (बी.एड.) देण्यात यावी, या शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील शिक्षकांनाही हे लाभ देण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी वित्तीय तरतूद करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २८.०४.२०१४ अन्वये मान्यताप्राप्त अनुदानित विजाभज प्राथमिक आश्रमशाळेतील बी.एड. अर्हताधारण केलेल्या शिक्षकांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून प्रशिक्षित वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) सदर शासन निर्णयामुळे येणाऱ्या वाढीव वित्तीय भाराचा खर्च आश्रमशाळांकरिता असलेल्या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील मुकबधिर विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व शासकीय आरक्षणानुसार नोकरी मिळण्याबाबत**

**(२३) * ११०५९ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक ६८१२ ला दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मुकबधिर विद्यार्थ्यांना नोकरीत ३ टक्के आरक्षण दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ टक्के आरक्षणानुसार मुकबधिर विद्यार्थ्यांना नोकरी देण्याबाबतच्या या नियमाचे पालन होत नसल्याच्या तक्रारी मुकबधिर विद्यार्थ्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरामध्ये मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणाची दखल घेऊन शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम ३२ व ३३ नुसार अपंग व्यक्तींसाठी गट अ ते गट ड मधील नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Post) सरळ सेवा भरतीमध्ये अस्थिव्यंग, अंध व क्षीणदृष्टी तसेच मुकबधिर यांना प्रत्येकी ०१ टक्का असे एकूण ३ टक्के आरक्षण ठेवण्याची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०२.०५.१९९८ च्या शासन परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

अशा प्रकारचे निवेदन/तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

सामाजिक न्याय विभागातंर्गत अपंगाकरीता इयत्ता १० वी पर्यंतच्या विशेष शाळा / कर्मशाळा कार्यरत आहेत. तथापि नागपूर येथील मूकबधिर औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शंकरनगर, जिल्हा नागपूर संचलित मूकबधिर विद्यालय, शंकरनगर, जिल्हा नागपूर या मुकबधिर विद्यालयात इयत्ता ११ व १२ वीचे उच्च माध्यमिक वर्ग सुरु असून, या वर्गास शिक्षण विभागाने विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे व पदवीपर्यंत शिक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश आयुक्त, अपंग कल्याण यांना देण्यात आलेले आहेत.

(४) व (५) याबाबतची कार्यवाही पूर्वीपासून सुरु असल्याने, अन्य उपाययोजना करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भडगाव (जि.जळगांव) येथील न्यायालयाच्या इमारत हस्तांतरणाबाबत**

**(२४) * १२४३२ डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (जि.जळगांव) येथील न्यायालयाची इमारत पूर्ण होऊन ३ वर्ष झाली परंतु अद्याप हस्तांतरित झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे हस्तारणास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, इमारतीचे हस्तातर करुन ती केव्हापर्यंत उपयोगात आणणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सदर इमारतीचे बांधकाम दि. १२.१.२०१४ रोजी पूर्ण झाले आहे.

(२) इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी दि. १६.९.२०१४ रोजीच्या बैठकीत सुचविलेली अतिरिक्त कामे जसे की, अंतर्गत रस्ता (खडीकरण), न्यायदान कक्षास डायस व बोअरवेलमधील पंप बसविणे इ. कामे करण्यात आली.

तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी दिलेल्या सुचनांनुसार उर्वरित कामाचे (फर्निचर, अंतर्गत रस्ते, सुरक्षा चौकी, पथदिवे इ.) कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यात आले असुन मंजुरी अप्राप्त आहे.

(३) व (४) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांचेकडे इमारत हस्तांतरीत करुन घेणेबाबत पत्रव्यवहार सुरु असुन संबंधित विभागाने इमारतीचा ताबा घेतल्यास सदर इमारत तात्काळ उपयोगात आणणे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील साखर उद्योगावर अवलंबून असलेल्या कामगांरांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) * १२३३४ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात यावर्षी कमी पाऊस झाल्याने यंदाच्या गळीत हंगामासाठी गाळपास येणाऱ्या ऊसापैकी ५० टक्के ऊस पाण्याअभावी जळाल्याने या उद्योगावर अवलंबून दीड ते दोन लाख कुटुंबाची रोजीरोटी दुष्काळाने संकटात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर उद्योगावर अवलंबून असलेल्या कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सोलापूर जिल्हयात सन २०१४-१५ गाळप हंगामात ऊस पिकाखालील क्षेत्र २,०५,५१४ हेक्टर होते. हंगाम अखेर १,९१,२६,७०८ टन ऊस गाळप केले आहे. तर २०१५-१६ गाळप हंगामात कृषी विभाग व या विभागाने संयुक्तपणे केलेल्या अंदाजानुसार ऊस क्षेत्र १,८३,१४७ हेक्टर आहे. दि. ५ डिसेंबर, २०१५ अखेर ४०,५०,७९४ टन ऊस गाळप केले आहे. यंदाच्या गळीत हंगामासाठी गाळपास येणा-या ऊसापैकी ५० टक्के ऊस पाण्याअभावी जळाल्याबाबतच्या परिस्थितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. तसेच महसूल विभागाने घोषित केलेल्या पैसेवारीनुसार या जिल्हयातील एकाही गावाची पैसेवारी ५० टक्के पेक्षा कमी नाही.

(२) महात्मा गांधी राष्ट्रिय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत १८ वर्षे वयावरील ज्या व्यक्ती/मजूराकडून अकुशल रोजगाराची मागणी करण्यात येते, अशा व्यक्तीस काम उपलब्ध करुन देण्यात येते. सोलापूरसह महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांत अशा प्रौढ व्यक्तीसाठी मागणीनुसार रोजगार उपलब्ध करण्यासाठी तजवीज करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर रोड (जि.यवतमाळ) लगत असलेल्या गुरुलक्ष्मी टेक्सटाईलला आग लागून झालेल्या नुकसानीची भरपाई तसेच अग्निशमन यंत्रणेची व्यवस्था करण्याबाबत**

**(२६) * ११६८३ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर रोड (जि.यवतमाळ) लगत असलेल्या गुरुलक्ष्मी टेक्सटाईला सकाळी १० च्या सुमारास अचानक आग लागून आगीमध्ये अनेक मशीन, उत्पादीत साहित्य जळून खाक झाले असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटना टाळण्यासाठी याठिकाणी पाण्याची कुठलीही व्यवस्था नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आगीच्या दुर्घटना टाळण्याबाबत सदरील परिसरात पाण्याची सोय करण्याबाबत तसेच नुकसान झालेल्या कंपनीला नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे,

गुरुलक्ष्मी कॉटेक्स प्रा.लि.मौजा डोळंबा, ता.जि.यवतमाळ, येथे ही कंपनी आहे, सदर कंपनीला भारत सरकार, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, जनसंपर्क आणि शिकायत अनुभाग, नवी दिल्ली, यांचे दिनांक ३० जुलै, २०१५ चे नोंदणी प्रमाणपत्र आहे. या कंपनीला दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी सकाळी ९.४५ वाजता शॉटसर्कीटमुळे आग लागली. असे दिनांक २३.९.२०१५ रोजीच्या पोलीस पंचनाम्यात नमूद आहे.

(२) गुरुलक्ष्मी कॉटेक्स प्रा.लि.मौजा डोळंबा येथे एकूण २ बोअरवेल आहे तसेच हायड्रंटची एक लाख लिटर क्षमतेची पाण्याची व्यवस्था असल्याचे दिनांक २३.९.२०१५ रोजीच्या पोलीस पंचनाम्यात नमूद आहे. तसेच अग्नीशमन वाहन तात्काळ घटनास्थळी पोहचून दुर्घटना टाळण्याबाबत उपाययोजना करण्यात आलेली होती.

(३) सदर आग शॉटसर्कीटने लागली असल्याने नैसर्गिक आपत्तीशी संबंधित नाही. तसेच कारखान्यात आग विझविण्यासाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध आहे. तसेच गुरुलक्ष्मी कॉटेक्स प्रा.लि.या कंपनीने एस.बी.आय., जनरल इन्शुरन्स कंपनीला रु.१२३०.०० लाख इतक्या रक्कमेचा विमा दावा सादर केला आहे.

या शिवाय या प्रकरणी कामगार विभागाकडून करण्यात आलेल्या चौकशीअंती सदर कारखाना विना परवाना सुरु असल्याचे आढळून आले असून त्यामुळे तसेच आगीच्या घटनेची माहिती औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास विहित वेळेत न कळविल्याने कामगार विभागाने भोगवटादारा विरुध्द न्यायालयात खटला दाखल केला आहे. अशा प्रकरणात शासन स्तरावरुन नुकसान-भरपाई देण्याबाबत तरतुद नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील यंत्रमाग कारखाने बंद होत असल्याबाबत**

**(२७) * १२२२५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग व्यवसायाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यातील काही यंत्रमाग कारखाने बंद पडले असून काही कारखाने बंद होण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार भिंवडी शहरातील यंत्रमाग कारखाने बंद पडू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील दलित वसाहतीत सौर दिवे लावण्याबाबत**

**(२८) * १२२९७ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दलित वसाहतीत सन २०१३-१४ ते २०१६-१७ या कालावधीत सौरदिवे लावण्याच्या कामाचे सर्व आदेश शासनाने रद्द करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) सौरदिवे लावण्याचा आदेश रद्द केल्यामुळे दलित वस्तीत अंधाराचे साम्राज्य पसरुन नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असल्याने सौरऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे. सदरचा निर्णय, शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ अन्वये घेण्यात आला होता.

(२) व (३) सौर दिव्यांच्या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारींचा विचार करुन दिनांक १२ मे, २०१५ अन्वये घेतलेला निर्णय रद्द करण्यात आलेला आहे. तथापि, या प्रकरणी दलीत वस्ती मध्ये सौर दिवे लावण्याच्या योजनेच्या अंमलबजाणी बाबतचा आढावा घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ग्रुप ग्रामपंचायत नाते (ता.महाड, जि.रायगड) येथील काळोसे ते नाते गाव जोडरस्ता पुलाच्या कामास निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२९) * ११९०३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत नाते (ता.महाड, जि.रायगड) येथील काळोसे ते नाते गाव जोडरस्ता पुलाच्या कामास शासनाने सन २००८ मध्ये मंजूरी प्रदान करून अंदाजित रक्कम रुपये एक कोटी अठ्ठावीस लाख इतक्या रक्कमेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम माहे डिसेंबर, २०१२ मध्ये सुरु करण्यात येऊन सद्य:स्थितीत ४० टक्केच काम पूर्ण झाले असून उर्वरित ६० टक्के काम सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काळोसे ते नाते गाव जोडरस्ता पुलाचे गेल्या ७ वर्षापासून अपूर्ण राहिलेले काम पुर्ण करण्यात यावे, असे पत्र-निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांना अनुक्रमे दिनांक २९ जून, २०१५ व दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेले असून त्याप्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने पुलाच्या कामास सुधारीत मान्यता व निधी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,
(२) होय,
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेले दिसून आले नाही.
(४) अर्थसंकल्पात समाविष्ट असलेले काम आहे, त्या स्थितीत अंतिम करुन उर्वरित काम नाबार्ड-२१ च्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. नाबार्डकडून अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## पालघर सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता यांनी बनावट देयके अदा केल्याबाबत

**(३०) * ११७११ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ९६४३ ला दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता श्री.एम.वाय.शंखपाळे व उपविभाग, वाडा येथील सहाय्यक अभियंता श्री.डी.जी. होले यांनी बनावट देयके काढून १ कोटी ३७ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे वरिष्ठ विभागीय लेखाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी शासनाचे निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गैरव्यवहार केलेल्या सदर रकमेची वसुली संबंधित अभियंत्याकडून करुन त्यांचेवर कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) ठाणे (सा.बां.) विभागाच्या अखत्यारितील सा.बां.उपविभाग, वाडा येथील देखभाल व दुरुस्तीची सुमारे १.३७ कोटी रुपयांची १६ देयके विभागीय लेखाधिकारी यांच्या संमतीशिवाय मंजूर केल्याची बाब वरिष्ठ विभागीय लेखाधिकारी यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर सदर देयकांचे धनादेश रद्द करण्यात आले आहेत.

(२) याप्रकरणी अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालावरुन प्रस्तुत प्रकरणी प्रशासकीय अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले असून, सदर अनियमिततेस जबाबदार सर्व संबंधिताविरुध्द शिस्तभंगाविषयक कारवाई करण्याच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडून दोषारोपपत्रे मागविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) यवतमाळ येथील भूखंड वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(३१) * १२२५९ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) यवतमाळ येथील भूखंड वाटपात गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर भूखंड वाटपात जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, भूखंड वाटप योग्य प्रकारे होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही. याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही, असे एमआयडीसी ने कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटप भूखंड वाटप समित्यांमार्फत करण्यात येते. भूखंडाचे वाटप करण्यासाठी भूखंड वाटप समितीच्या बैठकीत संबंधित अर्जदार/उद्योजक किंवा उद्योजकांने नेमून दिलेला प्रतिनिधी हे मुलाखतीस हजर असतात, त्यावेळी कंपनीने सादर केलेली कागदपत्रे व प्रकल्पाविषयी मुलाखती दरम्यान सांगितलेली माहिती विचारात घेऊन समिती भूखंड वाटपाबाबत निर्णय घेते. अशा परिस्थितीत भूखंड वाटपात गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इस्लापूर व बाऱ्हाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या बँकेकडून शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज देण्याबाबत**

**(३२) * ११३३६ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इस्लापूर व बाऱ्हाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील २५ शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज देण्यासाठी इस्लापूर स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथील शाखा व्यवस्थापकाने नकार दिल्याने या शेतकऱ्यांनी बँकेसमोर माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान आमरण उपोषण केले असल्याचे तसेच सदर बँकेच्या बाऱ्हाळी शाखेतील अनागोंदी कारभारामुळे शेतकऱ्यांना पेऱ्याप्रमाणे रक्कम मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इस्लापूर व बा-हाळी येथील शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज सदर बँकेकडून मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा इस्लापूर, ता.किनवट येथे कॉ.तुकाराम आडे यांनी दि.२२.०९.२०१५ रोजी त्यांच्या दोन ते तीन साथीदारांसह उपोषण सुरु केले होते. तथापि, बँकेने त्यांना दि. २८.०६.२०१५ रोजी रक्कम रु. ९९,०००/- कर्ज वितरीत केले आहे. त्याच प्रमाणे बँकेच्या बाऱ्हाळी येथील शाखेकडून शेतक-यांना पे-याप्रमाणे पीक विमा रक्कम मिळाली नाही हे खरे आहे.

(२) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा इस्लापूर, ता.किनवट या शाखेने सन २०१५-१६ मध्ये ३५०० शेतक-यांना रक्कम रु. ५.१० कोटी पिक कर्ज वाटप केले आहे. तसेच स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा बा-हाळी, ता. मुखेड या शाखेने सन २०१५-१६ मध्ये ११३२ शेतक-यांना रक्कम रु. ४.१४ कोटी पिक कर्ज वाटप केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शबरी घरकुल योजना पूर्ण क्षमतेने राबविणेबाबत**

**(३३) * १२०९५ श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील शबरी घरकुल योजनेसाठी असलेला सुमारे सहा कोटी ३३ लाख रुपयाचा निधी लाभार्थी मिळत नसल्याचे कारणास्तव गत ३ वर्षापासून वापराविना पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शबरी घरकुल योजनेसाठी लाभार्थी शोधुन सदर योजना पूर्ण क्षमतेने राबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात यवतमाळ जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना शबरी घरकूल योजनेंतर्गत घरकूल देण्याकरीता रु. ६.३३ कोटी इतका निधी संबंधित प्रकल्प कार्यालयाकडून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यवतमाळ या कार्यालयास सन २०१३-१४ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी यवतमाळ जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांची स्थळपाहणी तपासणी करुन अंतिम यादी करण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावर सुरु आहे.

-----------------

**नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३४) * १२०२२ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ६४ कोटी एफडीचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. तथापि, सदरहू बाब जुलै, २०१४ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) देना बँकेमार्फत याप्रकरणी दाखल झालेल्या तक्रारीवर सी.बी.आय.कडे चौकशी करण्यात आली आहे.

(३) सी.बी.आय. ने सदर प्रकरणी चौकशी करुन देना बँकेचे तत्कालीन मुख्य शाखा प्रबंधक व इतर तीन व्यक्ती यांचे विरोधात सी.बी.आय.चे विशेष न्यायालय मुंबई येथे आरोपपत्र दाखल केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सातारा येथील पुणे-बंगळूर महामार्गाच्या विस्तारीकरणाबाबत**

**(३५) * ११४९० श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील पुणे-बंगळूर महामार्गावरील खांबाटकी घाटाच्या विस्तारणीकरणात शिवकालीन पुरातन खामजाई मंदिर व दत्तमंदिर पाडण्याची शक्यता असून या विरोधात खंडाळा ग्रामस्थ आक्रमक झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी डोंगराच्या बाजूने रुंदीकरण करण्याऐवजी दरीच्या बाजून रुंदीकरण केल्यास हा ऐतिहासिक वारसा अबाधित राहू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत सुरु आहे. रस्त्याच्या रुंदीकरणात येणारी प्रश्नांकित धार्मिक स्थळे व इतर बांधकामे इतरत्र स्थलांतर करण्याकरीता लागणारी नुकसान भरपाईची रक्कम संबंधित विशेष भुमी अधिग्रहण अधिकारी यांचेकडे दि. १६.११.२०१५ रोजी जमा केली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) व (३) रस्त्याचे रुंदीकरण हे सवलत करारनाम्याच्या वावानुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे ताब्यात असलेल्या रस्त्याच्या हद्दीत सुरु आहे. दरीकडील बाजू वनखात्याकडे असून त्याबाजूस रुंदीकरण तांत्रिकदृष्टया योग्य होणार नसल्याचे तसेच आता रस्त्याच्या वावामध्ये बदल केल्यास प्रकल्प पुर्ण होण्यास विलंब होईल असेही प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या बेकायदा कामांबाबत

**(३६) * ११५५७ श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील सार्वजनिक बांधकाम विभागात मागील ७ महिन्यापासून अतिरिक्त कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असलेले श्री. गाडेकर यांनी आपल्या कार्यकाळात अनेक बेकायदा कामे केल्यामुळे शासनाला करोडो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार सार्वजनिक बांधकाम विभाग व एसीबीकडे दाखल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, संबंधित दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) श्री.गाडेकर यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना चौकशी करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. मुख्य अभियंता यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे अंजनवेल-बोरभाटले (ता.गुहागर,जि.रत्नागिरी) येथील गॅस ॲड पॉवर कंपनीत झालेली वायू गळती**

**(३७) * १२१०९ श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंजनवेल-बोरभाटले (ता.गुहागर,जि.रत्नागिरी) येथील गॅस ॲड पॉवर कंपनीतून गॅसची गळती होवून तेथील ग्रामस्थांना चक्कर येणे, उलट्या येणे इत्यादी सारखे विकार झाल्याचे दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीच्या परिसरातच गेल इंडियाचा गॅस टर्मिनलचा मोठा प्रकल्पही सुरु असून सदरील घटनेमुळे अजंनवेल-बोरभाटले परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती काय आढळून आले व त्यानुसार उक्त भागातील नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) गेल (इंडिया) लि. या कंपनीकडून प्राप्त माहितीनुसार, मौजे अंजनवेल-बोरभाटले येथील गॅस अॅन्ड पॉवर कंपनीतून वायू गळती झालेली नाही.

(२) सदर परिसरातील ग्रामस्थांकडून याबाबत कसलीही भिती वा धास्ती व्यक्त करण्यात आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सडक अर्जुनी व मोरगाव (जि. गोंदिया) येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाच्या चुकाऱ्याची रक्कम न मिळाल्याबाबत**

**(३८) * १२५४६ श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक अर्जुनी व अर्जुनी व सडक मोरगाव (जि.गोंदिया) येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील देव्हाडा येथील वैनगंगा शुगर अँड पॉवर कारखान्यांना ऊसाची विक्री मागीलवर्षी माहे डिसेंबर व जानेवारी महिन्यात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारखान्याने संबंधित ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाच्या चुकाऱ्याची रक्कम अद्याप दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच संबंधित ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चुकाऱ्याची रक्कम देण्याचे दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. सडक अर्जुनी, नवेगांवबांध व सोदड या गटातील, सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया येथील ऊस उत्पादक शेतक-यांनी ४३९९८ मे.टन ऊसाची विक्री वैनगंगा शुगर अॅण्ड् पॉवर लि., देव्हाडा, जि.भंडारा या साखर कारखान्यास माहे डिसेंबर व जानेवारी या महिन्यात केलेली आहे.

(२) कारखान्याने गाळप केलेल्या ४३९९८ मे.टन ऊसाचे रु. १६३९ प्रति मे.टन (निव्वळदेय) रास्त व किफायतशीर दर एफआरपी प्रमाणे होणा-या रु. ७२१.१४ लाख रकमेपैकी रु. ६२१.३६ लाख रक्कम अदा केलेली आहे व उर्वरित रक्कम रु. ९९.७८ लाख देयबाकी आहे. उपरोक्त देयबाकी असलेली संपूर्ण रक्कम दि. ३१ डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत अदा करण्यात येईल असे कारखान्याने कळविले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-ठाणे परिसरातील सागरी किनारपट्टीवरील अतिक्रमण रोखण्याबाबत**

**(३९) * ११६६६ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-ठाणे परिसरातील सागराच्या पुर्व किनारपट्टीने मानवी वस्तीत ३०० मीटर आत व पश्चिम किनारपट्टीने ३०० मीटरपर्यत आत अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर व चेंबुर-मानखुर्द या भागातील मिठागरांच्या जमिनी जलमय होण्यापासून वाचविणे तसेच येथील अतिक्रमण थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
मुंबई-ठाणे परिसरातील समुद्राच्या पूर्व किनापट्टीची लांबी २५ किमी असून या लांबीत धुप झालेली नाही. समुद्राच्या पश्चिम किनापट्टीची लांबी २१६ किमी असून त्यापैकी विविध ठिकाणी ११४ किमी लांबीत काही प्रमाणात धुप झालेली आहे.
(२) मिरा-भाईंदर पश्चिम किनारपट्टीवर वसलेले असून पश्चिम किनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येतील.
मिठागारच्या जमिनी केंद्र शासनाच्या अधिनस्त मीठ आयुक्त (salt Commissioner) यांच्या अधिपत्याखाली असून चेंबूर-मानखुर्द या भागातील मिठागराच्या जमिनी जलमय झाल्या नसल्याचे मीठ आयुक्त यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४०) * १२६७१ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८०८७ ला दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याकरिता मौजे सायने बु.|| येथील ४९४.२३९१ हे.आर व मौजे सायने खु. || येथील ८७.५३ हे.आर इतके क्षेत्र अधिसूचित करण्याची अधिसूचना दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली तसेच सदर क्षेत्राच्या नुकसान भरपाईचा दर रुपये १५ लाख प्रती एकर इतका घोषित करण्यात येवूनही संबंधित खातेदारांकडून या भुसंपादनास विरोध दर्शविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उद्योग मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मौजे सायने बु.|| येथील ४९४.२३९१ हे.आर इतके क्षेत्र, भुसंपादनास असलेला विरोध व पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेवून सदर क्षेत्रास वगळण्याचा जो निर्णय घेण्यात आला, त्यानुषंगाने सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, सायने खु.|| येथील ८७.५३ हे.आर इतके क्षेत्र मालेगांव औद्योगिक क्षेत्रासाठी शिल्लक राहत असल्यामुळे सदर क्षेत्र संपादन करणे आर्थिकदृष्टया व्यवहार्य होत नसल्याने ते क्षेत्र देखील वगळण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मालेगांव (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीसाठी माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये अधिसूचित सायने बु.|| व सायने खु.|| येथील संपूर्ण क्षेत्रच वगळण्यात येत असल्याने मागील कालावधीपासून सुरु असलेली प्रक्रिया व्यर्थ ठरली, हे खरे आहे काय,

(५) मालेगांव औद्योगिक क्षेत्रासाठी आता कोणते क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले वा येत आहे,

(६) नसल्यास, मालेगांव येथे उद्योग वाढीस प्रोत्साहन - उत्तेजन मिळावे, यासाठी मालेगांव औद्योगिक वसाहतीस जमीन, पाणी व अन्य सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही, मालेगाव औद्योगिक वसाहतीसाठी सदरचे क्षेत्र अधिसूचीत केले होते. तथापि खातेदारांचा भूसंपादनास असलेला विरोध व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध नसल्याने सदरचे क्षेत्र विनाअधिसूचीत करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) व (६) दि. ११/०१/२००७ च्या शासन अधिसूचनेन्वये मौजे सायने बु.येथील ११३.२० हे.आर.क्षेत्र अधिसूचीत केले होते. सदर जमीन संपादन प्रक्रिया सुरु असून त्यापैकी ७४ हे.आर.क्षेत्राचा ताबा महामंडळास प्राप्त झाला आहे. तसेच, मालेगाव येथे उद्योग वाढीस प्रोत्साहन मिळावे यासाठी मालेगाव औद्योगिक क्षेत्रातील मौजे अजंग येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे ३४८.०७ हे.आर.क्षेत्र अधिसूचीत करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**मुंबई - तळेगांव - चाकण - अहमदनगर आणि औरंगाबाद**
**शहरांना जोडणा-या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(४१) * १३२०३ श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई - तळेगांव - चाकण - अहमदनगर आणि औरंगाबाद अशा महत्वाच्या शहरांना जोडणा-या राज्य मार्ग क्र.५५ या रस्त्याच्या चौपदरीकरणाची घोषणा शासनाच्या लालफितीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावरील अनेक ठिकाणी रस्ता अरूंद असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असून राज्य शासनाने राज मार्ग क्र.५५ चे चौपदरीकरण करण्याबाबत निर्णय घेतला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) तळेगांव-चाकण रस्ता रा.मा.क्र.५५ कि.मी. ०.० ते २४.०० या प्रकल्पाची किंमत सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार अद्ययावत करणे व शासनाच्या सुधारित पथकर धोरणानुसार हलकी वाहने, एस.टी. बसेस व स्कूल बसेस वगळून प्रकल्पाची सुसाध्यता तपासण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

चाकण-शिक्रापूर या लांबीमध्ये चौपदरीकरण करणे या कामाचे उद्योजकास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

शिक्रापूर - अहमदनगर - औरंगाबाद रस्त्याचे चौपदरीकरण यापूर्वी पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खारघर (नवी मुंबई) येथील शीव - पनवेल टोलनाक्यावरील टोल बंद करण्याबाबत**

**(४२) * १३२२५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ४१५६ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (नवी मुंबई) येथील शीव - पनवेल टोलनाक्यावर लहान तसेच शासकीय वाहनांना टोलमुक्ती देण्याच्या धोरणामुळे निर्माण झालेला नुकसान भरपाईचा वाद सरकारी तडजोडीनुसार निकाली काढण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनाला दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने त्रिसदस्यीय समितीने ठेकेदाराला देण्यात येणा-या नुकसान भरपाईचा वाद निकाली काढण्याचे आदेश शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर वाद तडजोडीनुसार निकाली काढण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच ठेकेदाराला दर महिन्याला द्यावा लागणा-या नुकसान भरपाईबाबत कोणती तरतूद केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

(२) होय,

(३) होय,

उद्योजकाला द्यावयाच्या नुकसान भरपाई माहे जून, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ पर्यंत अशी एकूण पाच महिन्यांची रक्कम उद्योजकास अदा केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

**(४३) * १३३०३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सन २००७ मध्ये १४८ कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ जुलै, २००७ च्या शासन निर्णयानुसार या कनिष्ठ महाविद्यालयांना सन २०१२ ते २०१५ पर्यंतच्या कालावधीत टप्या टप्याने शिक्षक व शिक्षकेत्तर अनुदान देण्याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच शिक्षक / शिक्षकेत्तरांना अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २६.६.२००८ अन्वये १२५ व दिनांक ३१.८.२००९ अन्वये २३ अशा एकूण १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांना परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २६.६.२००८ अन्वये सदरहू उच्च माध्यमिक आश्रमशाळांना टप्प्या-टप्प्याने अनुदान देण्यात येईल, असे ठरले होते.

(३) व (४) मंत्रीमंडळाने ५० उच्च माध्यमिक आश्रमशाळांना परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, तदनंतर १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांना परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मनोर, वाडा ते भिवंडी (जि.ठाणे) या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(४४) * १३६६० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर, वाडा ते भिवंडी (जि.ठाणे) या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा ठेका सुप्रिम इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीला देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने महामार्गाच्या चौपदरीकरणाचे केलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट व अपूर्ण अवस्थेतील कामामुळे महामार्गावर अपघात होवून अनेकांना प्राण गमवावा लागला, तर कित्येक जण जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्नुसार दोषी कंपनीविरूध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई व दक्षता पथक, मुंबई यांनी केलेल्या पाहणीच्या अनुषंगाने सादर केलेल्या अहवालानुसार महामार्गाच्या चौपदरीकरणाचे कामात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत उद्योजकास क्षेत्रिय स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

वन विभाग व वनविकास महामंडळाच्या क्षेत्रात मोडत असलेली जमीन ताब्यात मिळाल्यानंतर चौपदरीकरणाचे काम पुर्ण करुन देण्याचे उद्योजकाने हमीपत्र दिले आहे. सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(३) नाही.

सदर रस्त्यावर झालेले बहुतांशी अपघात हे वाहतुकीच्या नियमांचे पालन न केल्यामुळे झाले असल्याचे पोलीस विभागाच्या अहवालावरुन दिसून येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील आदिवासी फासे पारधी समाजाच्या मागण्यांबाबत

**(४५) * १३६६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील आदिवासी फासे पारधी समाजास सवलती मिळण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी शालेय विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी अमरावतीचे विभागीय आयुक्त यांचे कार्यालयावर माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या दरम्यान मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारधी अनुदानाअंतर्गत घरकुल योजना २०१२-१३ मधील मंजूर यादीला अद्याप निधी मिळाला नसून तो त्वरीत मिळावा अशी मागणी या वेळी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पारधी समाजास ई-वर्ग जमिनीचे पट्टे देणे, त्यांच्यासाठी स्वयंरोजगाराच्या योजना राबविणे याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करीत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

(२) नाही.

(३) महसुल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक जमीन-०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१, दि. १२.०७.२०११ मध्ये गायरान/गुरचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणत्याही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजुर करण्यात येऊ नये असे नमूद केले आहे. यामुळे पारधी समाजास ई-वर्ग जमिनीचे पट्टे देण्याबाबत विचार करता येत नाही. तसेच पारधी पॅकेज अंतर्गत पारधी समाजाच्या सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या आवडीनुसार त्यांना प्रशिक्षण देऊन व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गेवराई-शेगांव (जि.बीड) रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४६) * १४०८१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई-शेगांव (जि.बीड) रस्त्याचे काम बाळराजे कन्स्ट्रक्शन व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी बाळराजे कन्स्ट्रक्शनने उमापूर - महारटाकळी दरम्यान दीड किलोमीटर रस्त्याचे निकृष्ठ काम केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बाळराजे कन्स्ट्रक्शन व त्याच्या मालकावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) विषयाधीन काम बाळराजे कन्स्ट्रक्शन यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कंत्राटदार म्हणून केले आहे.

(२) व (३) विषयांकित रस्ता हा नदीकाठ व साखर कारखाना परिसरातील आहे. सदर रस्त्यावरुन वाळूची व ऊसाची अवजड वाहतूक सातत्याने चालू असल्याने या रस्त्याच्या काही पृष्ठभाग खराब झाला होता. या रस्त्याच्या खराब झालेल्या पृष्ठभागाची संबंधित कंत्राटदाराकडून त्यांच्या खर्चाने दुरुस्ती करुन घेण्यात आली असून सद्य:स्थितीत रस्त्याचा पृष्ठभाग सुस्थितीत असून वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कन्हान (जि.नागपूर) येथील स्नेहल मुलींच्या वसतिगृहातील गैरकारभाराबाबत**

**(४७) * १४१६९ श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हान (जि.नागपूर) येथील स्नेहल मुलींच्या वसतिगृहात गैरकारभार होत असल्याचे जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती यांच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर गैरकारभाराबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) वसतिगृहातील गैरकारभाराबाबत संबंधित संस्थेकडून खुलासा घेण्यात आला असून, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी केलेले आंदोलन**

**(४८) * १२५१५ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना पूर्ण कर्ज माफी मिळावी या मागणीबाबत एका राजकिय पक्षामार्फत आझाद मैदान येथे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनकर्त्यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय हे खरे आहे,

(२) खरीप २०१४ च्या हंगामातील पैसेवारी लक्षात घेता शासनाने राज्यातील २६ जिल्हयातील २३,८११ गावामध्ये टंचाई जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे रब्बी २०१४-१५ च्या हंगामातील पैसेवारी लक्षात घेता शासनाने राज्यातील ६ जिल्हयातील १२५३ गावामध्ये टंचाई जाहीर केली. या गावातील शेतकऱ्यांकडील तसेच माहे नोव्हेंबर व डिसेंबर मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाच्या वसुलीस स्थगिती व शेती कर्जाचे रुपांतरण करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे. माहे जून अखेर ७ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी १,२१,०२० शेतकऱ्यांचे रु. ७७९.३८ कोटीच्या पीक कर्जाचे रुपांतरण केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुळशी धरणावरील मुळशी-वाघवाडी (ता.मुळशी, जि.पुणे) पुलाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(४९) * १२६९४ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी धरणावरील मुळशी-वाघवाडी (ता.मुळशी, जि.पुणे) पुल बांधण्यासाठी सन २००४ पासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम केल्यास तेथील ५२ गावातील व औरंगाबाद-नगर-कोलाड या ठिकाणी जाण्यास २५ कि.मी. अंतर कमी होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या सर्वेक्षणासाठी सन २००८-२००९ च्या अर्थसंकल्पात रुपये ५० लक्ष तरतुद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानंतर अर्थसंकल्प किंवा पुरवणी अर्थसंकल्पात सदर पुलाच्या सर्वेक्षणासाठी निधीची तरतूद समाविष्ट करण्यासाठी तसेच निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) होय.

(४) व (५) प्रश्नांकित पुलाचे काम मंजूरी, निकष व निधीच्या उपलब्धतेच्या अधिनतेने हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

## खामगांव (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम.आय.डी.सी.) वाढीव जागेच्या प्रस्तावाला मंजुरी मिळणेबाबत

**(५०) * १२५९४ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ८१४४ ला दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम.आय.डी.सी.) वाढीव जागेच्या प्रस्तावाला मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला तात्काळ मंजुरी देऊन जागा अधिग्रहीत करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, प्रस्तावाच्या मंजूरीस विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, खरे आहे
(२) व (३) अतिरिक्त खामगांव औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे सुटाळा बु., ता.खामगांव, जि.बुलढाणा येथील २५४.४६ हे.आर. जमीन संपादीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**सिनीअर सिटीझन वेल्फेअर ॲन्ड मेन्टेनन्स ॲक्ट, २००७**
**कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(५१) * १२९५५ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ नागरीकांचा छळ, उतारवयातील एकाकीपणा इत्यादींचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिकांसाठी सिनीअर सिटीझन वेल्फेअर ॲन्ड मेन्टेनन्स ॲक्ट, २००७ हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात आलेली नसून बहुसंख्य जिल्ह्यात या कायद्यानुसार लवादाची निर्मितीही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, ज्येष्ठ नागरीकांना जीवन अधिक चांगले जगता यावे, यासाठी शासनाकडून आणखी कोणते विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत वा येणार आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही. हे खरे नाही. सदरहू कायदा अस्तित्वात आल्यानंतर आई-वडिल व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम २०१० राज्य शासनाने दिनांक २३ जून, २०१० पासून लागू केले आहेत. हा कायदा व नियमांतर्गत ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी जिल्हास्तरावर न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.
(२) याबाबत अद्याप आढावा घेण्यात आलेला नाही. तथापि याबाबतची माहिती सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून मागविण्यात आली आहे.

(३) ज्येष्ठ नागरिकांना जीवन अधिक चांगले जगता यावे, यासाठी शासनाकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी खालील योजना राबविण्यात येत आहेत.

१) वृध्दाश्रम २) डे केअर सेंटर ३) स्मृतीभ्रंश

<u>ज्येष्ठ नागरीकांसाठी इतर योजना</u>

१) एस.टी. भाड्यामध्ये सवलत
२) श्रावणबाळ सेवा योजना (राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना)
३) शासकीय रुग्णालयामार्फत विनाशुल्क सेवा
४) ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र
५) वृध्द साहित्यिक व वृध्द कलावतांना मानधन

-----------------

**डिगडोह (दबी) (ता.हिगंणा, जि.नागपूर) येथील दलित वस्ती विकासासाठी उपलब्ध निधी इतर कामांसाठी खर्च केल्याबाबत**

**(५२) * १३०७१ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिगडोह (दबी) (ता.हिगंणा, जि. नागपूर) येथील दलित वस्तीच्या विकासासाठी शासनाकडून मिळालेला निधी इतर कामांसाठी खर्च केला जात असल्यामुळे वस्तीतील विकास कामांची व शासनाकडून मिळालेल्या निधीची चौकशी करण्याची मागणी दलितवर्गाकडून केली जात असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निधी इतर कामांसाठी खर्च करणाऱ्या संबंधित दोषीवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी येथील नवीन वळण (बाय-पास) रस्ता मंजूर करण्याबाबत

**(५३) * ११७६६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहराबाहेरील जुन्या वळण (बायपास) रस्त्याचे काम रद्द करुन नविन वळण रस्ता मंजूर करण्याबाबत जिल्हा विकास आराखड्यामध्ये मंजूरी देण्याबाबतचे नियोजन जिल्हाधिकारी, परभणी व अधिक्षक अभियंता, नांदेड यांच्याकडे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन वळण रस्ता करण्यासाठीचा आराखडा, भूसंपादन, निधी, उपलब्धता व इतर बाबीकरीता थोडक्यात माहिती काय आहे,

(३) तसेच किती मुदतीत सदरील रस्ता पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम पूर्णत्वात नेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भूसंपादनाबाबत प्रक्रीया केंद्र सरकारमार्फत प्रगतीत आहे.

(३) व (४) भूसंपादन प्रक्रीया पूर्ण झाल्यावर सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यावर निविदा विषयक पुढील कार्यवाही करुन रस्त्याचे काम करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील आनंदनगर एम.आय.डी.सी. मधील कंपन्यांकडून नियमाचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(५४) * ११७५१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराला लागून असलेल्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या आनंदनगर एमआयडीसीमधील अनेक कंपन्यांनी नियमांचे उल्लंघन केल्याने रोजगार, पर्यावरण, प्रदुषण असे गंभीर स्वरुपाचे प्रश्न निर्माण झालेले

असतानाही हे गैरप्रकार थांबविण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागांनीही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असून या कंपन्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी यासाठी अंबरनाथ एमआयडीसीमधील अतिरिक्त अभियंत्याच्या कार्यालयासमोर दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजीपासून तेथील नागरीकांनी आमरण उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आनंदनगर एमआयडीसी मधील कंपन्याच्या विरोधात अद्याप कारवाई न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, संबंधित विभागाच्या हलगर्जीपणामुळे यातील काही कंपन्या प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडून नियमित तपासणी करुन न घेता खोटे अहवाल सादर करित असल्याने प्रदुषणात मोठी वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एमआयडीसी क्षेत्रात स्थानिकांना पर्यवेक्षकीय नोकऱ्यांमध्ये ५० टक्के तर इतर नोकऱ्यांमध्ये ८० टक्के नोकरभरती करण्याचा सरकारचा नियम असताना येथील बहुतांश कंपन्या या सदर नियमाचे पालन करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(६) असल्यास, सदर कंपन्याविरोधात व अनियमिततेबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) या संदर्भात नागरिकांनी दिनांक २५/०८/२०१५ व २६/०८/२०१५ राजी उपोषण केले होते. तथापि, सदर समस्यांबाबत संबंधीत विभागांकडून दुर्लक्ष होत असल्याची बाब खरी नाही.

(३) सदर औद्योगिक महामंडळाने रासायनिक सांडपाणी वाहिन्या, पंपहाऊस व प्रक्रिया केलेले सांडपाणी वाहून नेण्यासाठी विसर्ग वाहिन्या टाकलेल्या आहेत. त्यांची कार्यक्षमता महाराष्ट्र नियंत्रण प्रदूषण मंडळाकडून नियमितपणे तपासण्यात येते.

सदर औद्योगिक वसाहतीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्रात नेमून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे २५ उद्योगांविरुध्द कारवाई करण्यात आली असून त्यापैकी २ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, १८ उद्योगांना प्रस्तावित निर्देश व ५ उद्योगांना उत्पादन बंदी आदेश देण्यात आले आहेत.

(४), (५) व (६) हे खरे नाही.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १७/११/२००८ अन्वये राज्यातील सर्व औद्योगिक घटकांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार आनंदनगर एमआयडीसी क्षेत्रातील औद्योगिक घटकांमध्ये स्थानिक उमेदवारांचे प्रमाण राखले असल्याचे दिसून येते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील रामझुला या पुलाच्या बांधकामाबाबत**

**(५५) * ११०२१ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक ९७४७ ला दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील रामझुला या पुलाचे एका बाजूचे बांधकाम पूर्ण झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित दुस-या बाजूचे काम रेल्वेने अडविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेल्वेने ११ कोटी रुपयांची मागणी केली आहे, हे खरे काय,

(४) असल्यास, सदर काम त्वरित पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) मध्य रेल्वेने कोडल चार्जेस रेल्वे विभागाकडे जमा केल्याशिवाय काम सुरु करु नये असे महामंडळास सूचित केले होते.

(३) होय.

(४) दिनांक २४.०९.२०१५ पासून जुना पूल तोडण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच टप्पा-२ च्या उड्डाणपूलाचे दोन स्तंभांचे पायासह काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आश्रमशाळांना धान्य पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(५६) * ११४३४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षी प्रकल्प कार्यालयाना प्रथमच आश्रमशाळांना लागणारे धान्य व किराणा वस्तु खरेदीचे अधिकार देण्यात आले आहेत, मात्र निविदा काढण्यास उशीर होत असल्याने दोन महिने उलटूनही आश्रमशाळांना धान्य पुरवठा झालेला नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय करताना मुख्याध्यापक व अधिक्षकांना समस्या येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळांना सुरळीत धान्यपुरवठा करण्यासाठी तात्काळ निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ साठी शासकीय आश्रमशाळांना लागणारे धान्य व किराणा वस्तु खरेदीचे अधिकार हे अपर आयुक्त स्तरावर देण्यात आलेले आहेत. त्यांनी विहीत मुदतीत ई-निविदा प्रसिध्द केलेल्या आहेत. परंतू काही तांत्रिक अडचणीमुळे (ई-निविदेला अल्प प्रतिसाद किंवा पात्र निविदाधारकांचे नमुने विहीत स्पेशिफीकेशन प्रमाणे नसणे इ.) निविदा प्रक्रिया अंतिम करण्यात जादा कालावधी लागलेला आहे. शासन निर्णय दिनांक २५/०२/२०१४ नुसार तांदुळ व इतर उपलब्ध अन्नधान्य व कडधान्य आदिवासी विकास महामंडळ नाशिक, यांचे कडून आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येत आहे. तसेच उर्वरीत अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणामाल प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावर खरेदी करण्यात येत आहे.

(२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर यांचे स्तरावर अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणामाल खरेदीसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रीयेच्या प्रस्तावास वित्तीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद, पांढरकवडा, दर्यापूर, आकोट, अमरावती येथील सहकारी तत्वावर चालणाऱ्या सुतगिरण्यामध्ये झालेला गैरव्यवहार

**(५७) * १४२७८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील वऱ्हाड प्रांतात पुसद, पांढरकवडा, दर्यापूर, आकोट, अमरावती येथील सहकारी तत्वावरील चालणाऱ्या सुतगिरण्यांच्या संचालकांनी कोट्यवधी रुपये शासनाकडून अनुदान घेवून केलेल्या गैरव्यवहारामुळे सदर गिरण्या बंद पडून हजारो कामगार बेरोजगार झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूपये १९४ कोटी १८ लाखाचे देणे कामगारांना अद्यापही न मिळाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामगारांची थकित रक्कम त्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

विदर्भामध्ये ५ सूतगिरण्या अवसायनात आहेत. अमरावती येथील सहकारी सूतगिरणी विद्युत मंडळाने गिरणीचा विद्युत पुरवठा बंद केल्याने दिनांक २३.३.१९८७ पासून बंद पडली. पुसद येथील यवतमाळ जिल्हा सूत व कापड गिरणी मर्या., पुसद या गिरणीचा निधी संपुष्टात आल्याने दिनांक २६.२.१९९१ पासून बंद पडली. पांढरकवडा येथील सहकारी सूतगिरणीची आर्थिक स्थिती डबघाईस आल्याने दिनांक ३१.३.१९९६ पासून बंद पडली. दर्यापूर येथील सहकारी सूतगिरणी सहकार न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने गिरणीची मालमत्ता जप्त केल्याने दिनांक २.७.२००७ पासून बंद पडली. आकोट येथील सहकारी सूतगिरणी गिरणीने विद्युत बिलाचा भरणा न केल्यामुळे गिरणीचा विद्युत पुरवठा खंडीत होऊन गिरणी दिनांक २५.६.१९९८ पासून बंद पडली. प्रस्तुत ५ ही सहकारी सूतगिरण्यांसंदर्भात प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

आकोट तालुका सहकारी सूतगिरणी मर्या. आकोट, या गिरणीसंदर्भातील दि. १.४.१९९४ ते दि. ३१.३.१९९७ या कालावधीच्या लेखा परिक्षण अहवालानुसार सदर कालावधीतील गैरव्यवहाराबाबत कलम ८८ अंतर्गत चौकशी करुन चौकशी अहवालाच्या अनुषंगाने व्यवस्थापनावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

विदर्भातील अवसायनातील ५ सहकारी सूतगिरण्यांमधील कामगारांची देणी रु.१५५३.२५ लाख आहेत.

(३) अवसायनातील सहकारी सूतगिरण्यांची अवसायन कार्यवाही पूर्ण करुन कामगारांची देणी प्राधान्य क्रम प्रमाणे भागविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गुंज येथील (जि.पालघर) जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असणाऱ्या शासकीय आश्रमशाळेची झालेली दूरवस्था

**(५८) * १२०६५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंज येथील (जि.पालघर) जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळेची इमारत अत्यंत दयनीय स्थितीत असल्याची बाब माहे ऑगस्ट २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या बांधकाम निरिक्षण अहवालात गुंज आश्रम शाळेच्या इमारती वापरण्यास योग्य नसल्याचा अहवाल जव्हार प्रकल्प अधिकाऱ्यांना माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करुन इमारतीची दुरूस्ती वा पुनर्निमाण करण्याबाबत शासनाने तातडीने कोणती कारवाई वा उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

उपविभागीय अधिकारी, सा.बां.वि., वाडा यांनी त्यांचे पत्र दिनांक ४.३.२०१५ अन्वये गुंज आश्रम शाळेच्या इमारती वापरास अयोग्य असल्याचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांना कळविले आहे.

(३) व (४) गुंज आश्रम शाळेकरिता खुपरी, ता.वाडा येथे इमारत भाडयाने घेण्याकरीता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील नोंदणी रद्द झालेल्या व अवसायनातील संस्थांचे बेकायदेशीररित्या पुनर्जीवन केल्याबाबत

**(५९) * ११८४८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सहकार विभागामार्फत राज्यातील सहकारी संस्थांचे सर्व्हेक्षण करुन कार्यस्थगित व बंद संस्थांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय घेतल्यामुळे अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी रद्द होऊन मिळकतीचे हस्तांतरण न झालेल्या गृहनिर्माण संस्थांच्या मिळकती पुन्हा बिल्डर/विकासक यांच्या नावावर होण्याचा धोका निर्माण झाला असून लातूर येथील विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, यांनी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान बीड जिल्ह्यातील नोंदणी रद्द झालेल्या ७३ आणि अवसायनातील २६ सहकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होण्यापूर्वीच सदर संस्था नोंदणी रद्द झाल्याने बिल्डर / विकासक यांचा फायदा होऊन सर्वसामान्य जनतेत शासनाविषयी रोष निर्माण झाला असून लातूर येथील विभागीय सहनिबंधक कार्यालयात शेकडो अपिल वर्षानुवर्षे प्रलंबित असताना आर्थिक हितसंबंध जोपासून सुमारे ९९ संस्थांचा समावेश बीड जिल्हा बँकेच्या मतदार यादीत करण्यासाठी आदेश पारीत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोंदणी रद्द झालेल्या अवसायनातील संस्थांचे पुनर्जीवन करताना बनावट स्वाक्षऱ्या, बनावट कागदपत्रे आदींचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याची तक्रार माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी रद्द करण्याच्या संदर्भात निकषात बदल करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, बोगस सहकारी संस्थांचे पुनर्जीवन केल्याप्रकरणी दोषीविरुध्द कोणती केली वा कारवाई करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. संबंधित सहायक निबंधक, बीड यांनी ४३ संस्थांचे अवसायनाचे आणि १०६ संस्थाचे नोंदणी रद्द करण्याचे आदेश पारित केले होते, त्यावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०४ अंतर्गत एकूण ४३ संस्थांनी अवसायनाचे अंतीम आदेश आव्हानित करणारे अपिल सहनिबंधक, लातूर यांचेकडे दाखल केलेले होते व १०६ संस्थांनी नोंदणी रद्द करण्याचे आदेश आव्हानित करणारे अपिल दाखल केले होते. या अपिलामध्ये कोणत्याही गृहनिर्माण संस्थांचा समावेश नव्हता. सदर अपिल हे विलंब क्षमापनाचे अर्जासह दाखल केले होते, त्यावर विलंब क्षमापित करण्याचे आदेश पारित करुन सुनावणी अंती अपिल अंशत: मंजूर करुन सहायक निबंधक यांनी फेर निर्णय घेण्याचे आदेश केलेले आहेत.

(२) नाही.

(३) अशी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) नोदंणी रद्द करण्याची अधिनियमात स्पष्ट तरतूद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण शिळफाटा (जि.ठाणे) रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत**

**(६०) * ११२४८ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी कल्याण-शिळफाटा एलिव्हेटेड रस्ता तयार करण्यात येणार असल्याची माहिती ठाण्याचे पालकमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी दिल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-शिळफाटा एलिव्हेटेड रस्ता तयार करण्यासाठी आवश्यक असणारा निधी उभारुन रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

कल्याण शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्यावर साखळी क्र. ०/०० ते २१/०० दरम्यान ६.५ कि.मी. लांबीत सहा पदरीकरण व उर्वरित लांबीत चार पदरी एलिव्हेटहड रस्ता बांधणे प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्यास दिनांक ३०.११.२०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

(२) सदर प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नेमणूकीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दमपूर मोहदा (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आत्महत्येचा केलेला प्रयत्न

**(६१) * १३११० श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमपूर मोहदा (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग १२ वी च्या ४ विद्यार्थ्यांनी झेंडावंदनाच्यावेळी स्टेजवर सर्वासमक्ष विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दमपूर मोहदा येथील विठ्ठलराव जाधव कनिष्ठ महाविद्यालय आश्रमशाळेत अनेक समस्या असून त्या समस्या पूर्ण करण्यात याव्यात यासाठी अनेक दिवसांपासून येथील विद्यार्थ्यांनी पाठपुरावा करूनही त्यांच्या मागण्या पूर्ण न करता त्यांना दबावाखाली ठेवत असल्याने सदरील विद्यार्थ्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) होय अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील विठ्ठलराव जाधव कनिष्ठ महाविदयालयातील चार विद्यार्थ्यांनी दि.१५.०८.२०१५ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात ४ विद्यार्थ्यांनी विष प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला, हे खरे आहे. याबाबतच्या चौकशीत सदर महाविद्यालयात तीन विषयांचे शिक्षक नेमण्यात आले नसल्याचे आढळून आले. मात्र, सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) होय.
(४) विद्यार्थ्यांकरिता तात्काळ विषय शिक्षक नेमण्याबाबत कळविण्यात आले होते. व त्यानुसार विषय शिक्षक नेमण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील वस्त्रोद्योग वीजदरातील वाढ, नवे वस्त्रोद्योग धोरण आणि कापूस साठेबाजीमुळे संकटात आल्याबाबत**

**(६२) * ११५८६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सांगली जिल्ह्यातील तसेच इतर वस्त्रोद्योग वीजदरातील वाढ, नवे वस्त्रोद्योग धोरण आणि कंपनीच्या कापूस साठेबाजीमुळे संकटात आल्याने यावर्षी १६० सूतगिरण्या बंद ठेवाव्या लागणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सूतगिरण्यांना उत्पादन खर्च व बाजारातील दर यांचा समतोल राखण्याच्या दृष्टीने सहकार्य योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, वस्त्रोद्योग टिकवून ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

राज्यात एकूण ६६ सहकारी सूतगिरण्या उत्पादनाखाली आहेत. पैकी ११ सहकारी सूतगिरण्या आर्थिक अडचणीमुळे बंद आहेत. बंद असलेल्या ११ सहकारी सूतगिरण्यांपैकी ८ सहकारी सूतगिरण्यांनी मंजूर प्रकल्प अहवालाप्रमाणे स्व-भागभांडवल व वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारणी केली नसल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने उत्पादनाखाली न आणल्याने वर्धनक्षमता कमी होऊन बंद झाल्या आहेत. तसेच ३ सहकारी सूतगिरण्या यंत्रसामुग्री जुनी असल्याने उत्पादन क्षमता कमी होऊन बंद झाल्या आहेत. वीज दरवाढ, नवे वस्त्रोद्योग धोरण अथवा कंपन्यांच्या कापूस साठेबाजीमुळे सूतगिरण्या संकटात आल्याचे निदर्शनास आले नाही.

राज्यातील उत्पादनाखाली असलेल्या एकूण सूतगिरण्यांपैकी सांगली जिल्हयात एकूण १० सहकारी सूतगिरण्या आहेत. यातील ३ सहकारी सूतगिरण्या आर्थिक अडचणीमुळे व आधुनिकीकरण पूर्ण न केल्याने बंद असून ७ सहकारी सूतगिरण्या सुरु आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी राज्य शासनाने वस्त्रोद्योग धोरण अंमलात आणले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहराबाहेरील बीड रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(६३) * १३५३१ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराबाहेरील बीड रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघात होवून मृत्यूचे प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याची दुरूस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) रस्त्याची दुरावस्था झाल्याने अपघात होऊन मृत्यूचे प्रमाण वाढत आहे, हे खरे नाही.

(२) रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीच्या अनुषंगाने वेळोवेळी तपासणी / पहाणी करण्यात आली आहे.

(३) रस्ता सुस्थितीत असून वाहतुकीस योग्य आहे. तसेच वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी सुचविल्याप्रमाणे बीड बायपास वर ८ ठिकाणांवरील दुभाजक बंद केले आहेत व आवश्यकतेनुसार काही ठिकाणी रस्त्यावर गतीरोधक बसविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती आश्रम शाळांमधील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन थकीत व नियमित वेतन देण्याबाबत**

**(६४) * १३९५० श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती अनुदानित आश्रम शाळांमध्ये अद्यापपावेतो किती व केव्हापासून अतिरिक्त कर्मचारी आहेत,

(२) असल्यास, सदर अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर समायोजन प्रक्रिया केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, विमुक्त जाती भटक्या जमाती आश्रम शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना दरमहा वेतन अदा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, त्यांना दरमहा वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, दरमहा वेतन अदा करण्यास किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) आजमितीस राज्यात विजाभज अनुदानित आश्रमशाळांमध्ये एकूण ९१५ शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त ठरलेले आहेत. साधारणत: शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून पटसंख्या कमी झाल्यामुळे कर्मचारी अतिरिक्त ठरलेले आहेत.

(२) जसजशी रिक्त पदे उपलब्ध होतील त्याप्रमाणे अशा रिक्त पदांवर अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात येणार आहे. तथापि, अतिरिक्त कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने व त्याप्रमाणात रिक्त पदे उपलब्ध होत नसल्याने या कर्मचाऱ्यांचे समायोजन होण्यास बराच कालावधी लागणार आहे.

(३) व (४) विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना दरमाह वेतन अदा करण्यात येते. तथापि, मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे समायोजन झाल्याशिवाय त्यांना वेतन अदा करता येत नाही. मात्र, समायोजनानंतर त्यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येते.

-----------------

**नंदुरबार येथील शासकीय वसतिगृहात ६०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत**

**(६५) * १३०३७ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार येथील शासकीय वसतिगृहातील प्रवेशापासून ६०० विद्यार्थी वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शासकीय वसतिगृहात ६०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) नंदुरबार जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहातील एकूण मान्य संख्या २७५ असून त्यापैकी रिक्त असलेल्या १३१ जागांपैकी १२३ जागेवर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सार्वजनिक बांधकाम विभागात झालेला गैरव्यवहार**

**(६६) * १२८४५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जयंत पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.अपूर्व हिरे, श्री.सुभाष झांबड, श्री.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २८३७ ला दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सार्वजनिक बांधकाम विभागातील सरकारी कामाचे खोटे चाचणी अहवाल सादर करून तसेच अभियंत्याने माहे मे, २०१५ मध्ये पदभार सोडल्यानंतर सुमारे ६५ कोटी रुपयांची कंत्राटे देणे, कोट्यवधी रुपयांची बनावट कामे दाखवून ५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कार्यकारी अभियंत्यासह २२ बांधकाम अभियंत्यांना

निलंबित करुन फौजदारी गुन्हा नोंदवला असून १९ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिक्षक अभियंता, मुंबई यांचेकडील चौकशी अहवाल तसेच मुख्य कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांचेकडून मागविण्यात आलेले अभिप्राय शासनास प्राप्त झाले आहेत काय,
(४) असल्यास, प्राप्त अहवालानुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन त्यांच्याकडून सदर रक्कम वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) (अ) महालेखापाल यांनी निदर्शनास आणून दिलेल्या संशयास्पद चाचणी अहवालाच्या अनुषंगाने दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांनी केलेल्या तपासणीमध्ये २५ कामांच्या चाचणी शुल्काचे रु.१,१४,२५०/- इतक्या रक्कमेची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(ब) तत्कालीन अधिक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ यांनी पदभार सोडल्यानंतर कंत्राटे दिल्याबाबत तक्रारीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्याकडून चौकशी सुरु आहे.
(क) इलाखा शहर सा.बां.विभाग, मुंबई मध्ये बनावट कामे दाखवून ५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याच्या प्राप्त तक्रारीबाबत मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी शासनास अहवाल सादर केला असून सदर अहवालासोबर रु.५.०० कोटीचा विनियोजन तपशील दिला आहे, त्यानुसार उक्त तक्रार वस्तुस्थितीवर आधारीत नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) कार्यकारी अभियंत्यासह १९ अभियंत्यांना निलंबित करण्यात आले. तसेच १८ कंत्राटदारांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.
(३) व (४) ५ कोटी रुपयांच्या गैरव्यवहारासंदर्भात अधिक्षक अभियंता, मुंबई यांच्याकडून प्राप्त चौकशी अहवाल तसेच त्या अनुषंगाने मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आलेले अभिप्राय शासनास प्राप्त झाले आहेत, त्यानुसार प्रस्तूत तक्रार वस्तुस्थितीवर आधारीत नसल्याचे निदर्शनास आल्याने, प्रस्तृत प्रकरणे कारवाईचा या रक्कम वसुल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांसाठी शैक्षणिक व सेवाविषयक आरक्षण लागू करण्याबाबत**

**(६७) * ११९१५ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७०४२ ला दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांसाठी राज्यात शैक्षणिक व सेवाविषयक आरक्षण लागू करण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकरणाधिन न्यायालयीन स्थगिती उठविण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मराठा आरक्षणाबाबत शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षणाबाबत सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, दि.९/१/२०१५ रोजी पारित करण्यात आला आहे. दि.२१/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.उच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाबाबतच्या शासनाच्या निर्णयास स्थगिती देण्यापूर्वी सदर आरक्षणांतर्गत झालेले शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश व शासकीय निमशासकीय सेवेतील नेमणूका अबाधित राहतील असे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच स्थगितीपूर्वी नोकरीकरिता जाहिरात दिली असल्यास सदर प्रवर्गाची पदे मा.उच्च न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत असेही आदेश देण्यात आलेले आहेत.

मा.उच्च न्यायालयाने दि.७/४/२०१५ रोजी महाराष्ट्र अधिनियम क्र.१/२०१५ या अधिनियमास स्थगिती दिलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने दि.७/४/२०१५ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार, याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून सुरु आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार येथील अवसायानात निघालेल्या पी.के.पाटील सहकारी बँकेची मुख्य इमारत धुळे/नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बँकेस देण्याबाबत

**(६८) * ११७१२ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ९०९७ ला दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार (जि.नंदुरबार) येथील अवसायानात निघालेल्या पी.के.पाटील सहकारी बँकेची मुख्य न्यायालयाची इमारत धुळे/नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बँकेस देण्यासंबंधी माजी सहकारी मंत्री यांचे दालनात सन २०१२-१३ मध्ये बैठक झाली होती, त्यानुसार धुळे/नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस बँकिंग व्यवसायासाठी हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव सहकार आयुक्तांनी सादर करावा असा निर्णय झाला असता सहकार आयुक्तांना असा प्रस्ताव सादर केला आहे काय,

(२) सहकार आयुक्तांनी माजी सहकार मंत्री यांच्या निर्णयानुसार प्रस्ताव सादर करण्याचे ठरले असता महाराष्ट्र राज्य सह.बँक लि, मुंबई या बँकेच्या कर्ज वसुलीसाठी प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने सदर मालमत्ता जप्त करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी सहकार मंत्र्यांच्या बैठकीत, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि., मुंबई यांनी कार्यवाही केली असता शासनाने या बँकेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने श्री.पी.के. अण्णा पाटील जनता सहकारी बँकेकडील थकीत कर्ज रु. ३२२.७३ लाख रकमेच्या वसुलीसाठी मा.सहकार न्यायालय मुंबई येथे दाखल केलेल्या दाव्यास अनुसरून सहकार न्यायालयाने दिनांक ०४.०५.२०१२ रोजी राज्य बँकेस दिलेल्या वसुली दाखल्यानुसार राज्य बँकेने दिनांक ११.०९.२०१५ रोजी पी के अण्णा पाटील बँकेची नंदूरबार व शिरपूर येथील स्थावर व जंगम मालमत्ता प्रतिकात्मक पध्दतीने जप्त केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगांव (जि.नांदेड) येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतीगृहातील अस्वच्छतेबाबत

**(६९) * ११३५५ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगांव (जि.नांदेड) येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहातील भोजन, पाणी, ड्रेनेज, दुर्गंधी इ. अस्वच्छतेमुळे वर्षभरापासून दररोज दोन ते तीन विद्यार्थीनी आजारी पडत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतीगृहातील अन्न, पाणी व इतर स्वच्छतेबाबत चौकशी करुन त्याचा दर्जा तपासण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील शेतकरी सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटी लि. बंद असल्याबाबत

**(७०) * १३४०६ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील दहा हजार क्विंटल कापसाचे जिनिंग व दोनशेच्यावर शेतकरी सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटी लि. या मागील तीन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंदाच्या हंगामासाठी या जिनिंग सुरू न झाल्यास अवसायानात निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यंदाच्या हंगामात उपरोक्त संस्था सुरू करण्यासाठी संस्थेतील कामगार, भागधारक व शेतक-यांनी मा.सहकार मंत्री, मा.सहकार राज्यमंत्री तसेच जिल्हयाचे पालक मंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी जिनिंग सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयात सहकारी तत्वावरील २२ जिनिंग प्रेसिंग संस्था आहेत. त्यापैकी ३ संस्था कार्यरत असून ६ संस्था बंद आहेत व १३ संस्था अवसायनात आहेत.

(२) सदर जिनिंग प्रेसिंग संस्थांमध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून कापूस प्राप्त झाल्यास या संस्थांमध्ये जिनिंग प्रेसिंगचे काम सुरु राहील. त्यामुळे त्या अवसायनात जाण्याची शक्यता नाही.
(३) सदर आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**निसरेफाटा (ता.पाटण, जि.सातारा) येथील कऱ्हाड-पाटण-चिपळूण तसेच उंब्रज-पाटण-चिपळूण या मार्गावरील अपघात रोखण्याबाबत**

**(७१) * ११४८९ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निसरेफाटा (ता.पाटण, जि.सातारा) येथील कऱ्हाड-पाटण-चिपळूण तसेच उंब्रज-पाटण-चिपळूण या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या निसरे फाट्यावरील तिकाटणे येथे कायम अपघात होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील दोन्ही मार्गावर सूचना फलक, दिशादर्शक फलक, गतिरोधकासह एका पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.
(२) उपरोक्त रस्त्यांवर निसरेफाटा या ठिकाणी सूचना फलक व दिशादर्शक फलक लावण्यात आलेले असून सदर ठिकाणी गतिरोधक बसविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु केलेली आहे. तसेच सदर ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत पोलीस अधिक्षक, सातारा यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील शिवाजीनगर रेल्वे फाटकाजवळ वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(७२) * १३०३१ श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील शिवाजीनगर रेल्वे फाटकाजवळ वाहतूक कोंडी होत असल्याने सातारा-देवळाई भागातील नागरिकांचा मार्ग सुकर व्हावा म्हणून भुयारी मार्ग काढण्याचा किंवा पूल उभारण्याचा प्रस्ताव रेल्वे प्रशासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फाटकावर पूल बांधण्याची मागणी नागरिकांकडून होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरीकांच्या सुविधेंसाठी पूलाचे बांधकाम तातडीने करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) महामंडळाने उपरोक्त भुयारी पुलाची आवश्यकता लक्षात घेवून आवश्यक प्रस्ताव व आराखडा रेल्वे विभागाकडे पाठविला आहे. रेल्वे खात्याची मंजुरी प्राप्त होताच निविदेसंबंधी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत

**(७३) * १३७६८ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांच्या अंतर्गत चालविण्यात येणा-या वसतिगृहात सन २०१५-१६ या सत्राकरिता विद्यार्थ्यांकडून किती अर्ज प्राप्त झाले आहेत,

(२) असल्यास, अर्धे सत्र संपले तरी २ हजार ४४४ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यास विलंब करणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २०१५-१६ या वर्षात वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी विद्यार्थ्यांकडून ७७, ८३९ अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२) आदिवासी विकास विभागांतर्गत मंजूर एकूण ४९१ वसतीगृहांसाठी मंजूर प्रवेश क्षमता एकूण ५८, ४६० इतकी असून इमारत क्षमता ५६३८४ इतकी आहे. त्यापैकी ५५,९९८ विद्यार्थ्यांना प्रकल्पस्तरावर प्रवेश देण्यात आला आहे व सुमारे २१८४१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही.

प्रकल्पस्तरावर ज्या वसतीगृहासाठी इमारत क्षमतेनुसार अर्ज प्राप्त झाले नाहीत व जागा रिक्त आहेत अशा वसतीगृहातील शिल्लक प्रवेश क्षमता आवश्यकतेनुसार जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाले आहेत अशा वसतीगृहासाठी तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करुन त्यानुसार प्रवेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनने शेतकऱ्यांना धानाचे चुकारे देण्याबाबत

**(७४) * १२५५५ श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनने शेतकऱ्यांना हमी भाव मिळावा यासाठी सानगडी (ता.जि.भंडारा) येथील आदर्श सहकारी भात गिरणीला खरेदी केंद्र म्हणून नियुक्त केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खरेदी केंद्राने शेतकऱ्यांच्या खरेदी केलेल्या धानाचे चुकारे अद्यापही शेतकऱ्यांना दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार या प्रकरणी पुढे काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शेतकऱ्यांना धानाच्या केलेल्या खरेदीचे चुकारे न देण्याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) दिनांक ०४/१२/२०१५ रोजी शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत.

(३) व (४) संबंधीत सब-एजंट संस्थेकडून कमी हुंडी निघाल्याने शेतकऱ्यांना विलंबाने रकमा अदा झाल्या आहेत.

(५) संबंधीत सब-एजंट संस्थेला असा प्रकार पुन्हा घडू नये म्हणून ताकीद देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील मुंब्रा बायपास रस्त्यावरील अपघातग्रस्त ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याबाबत**

**(७५) * १३०६३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मुंब्रा बायपास रस्त्यावर होत असलेल्या अपघातांची दखल घेवून मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी या रस्त्यावरील अपघातप्रवण ठिकाणी कॉंक्रीटची संरक्षक भिंत बांधण्याचे तसेच या रस्त्यावरील खड्डे केवळ तात्पुरते न बुजवता कायम दुरुस्त करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

(२) विषयांकित कामांसाठी निविदा निश्चिती करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर कामे निविदेतील तरतूदींप्रमाणे विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथे गिरणा नदीवरील टेहरे ते सोयगांव गिरणा पुलाचा भराव वाहून गेल्याबाबत

**(७६) * १२६७८ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील गिरणा नदीवर दीड ते दोन वर्षापुर्वी उभारण्यात आलेल्या टेहरे ते सोयगांव गिरणा पुलाचा भराव गिरणा नदीस आलेल्या पाण्याने वाहुन गेल्याची घटना दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणा नदीच्या पाण्यामुळे सोयगांव ते टेहरे यांना जोडणाऱ्या सोयगांव बाजुकडील भराव वाहून गेल्याने तेथे खड्डा पडल्याने रहदारीचा हा पुल बंद करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवघ्या दीड ते दोन वर्षापुर्वी लक्षावधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या पुलाचा भराव पहिल्याच पाण्यात वाहून गेल्याने पुलाच्या बांधकामाच्या गुणवत्तेविषयी व अस्तित्वेविषयी शंका उपस्थित करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सोयगांव ते टेहरे पुलाच्या बांधकामाच्या गुणवत्तेविषयीची चौकशी, तपासणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) भराव वाहून गेला हे खरे नाही.

तथापि गिरणा पुलाच्या सोयगांव बाजुकडील पोहोच रस्त्याच्या भरावास नदीतील पाण्याच्या मोठ्या प्रमाणात झालेल्या विसर्गामुळे निर्माण झालेल्या भोवऱ्याने वरील बाजूकडील भराव काही प्रमाणात कापला गेला होता.

(२) रस्त्यावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व पोहोच मार्गालगत कापल्या गेलेल्या भरावाच्या पुनर्भरणाचे काम त्वरेने पूर्ण करणेकरीता रस्त्यावरील अवजड वाहतूक एक दिवसासाठी बंद ठेवण्यात आली होती. सद्य:स्थितीत पूल वाहतुकीस सुरक्षित आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(७७) * १४१४८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिपत्यात येणाऱ्या रस्त्यावर खड्डे पडून रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

वैभववाडी (जिल्हा सिंधुदुर्ग) तालुक्यातील रस्त्याच्या लांबीत काही ठिकाणी सन २०१५ च्या पावसाळ्यात खड्डे पडले होते.

(२) रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पावसाळ्यात पडलेले खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरुन घेणेत आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### एम.आय.डी.सी (नवी मुंबई) परिसरात वास्तव्यास असलेल्या गरीब कुटुंबांच्या घरांना संरक्षण देणेबाबत

**(७८) * १३७०९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई परिसरातील एम.आय.डी.सी. क्षेत्रात अनेक वर्षांपासून गरजेपोटी बांधण्यात आलेल्या गरीब कुटुंबातील रहिवाशींच्या घरांना अनधिकृत ठरवून त्यांना उद्योग विभागाने नोटीस बजावल्या असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नोटीसा बजावून त्यांच्यावर कारवाई झाल्यास या गरीब कुटुंबाचा निवा-याचा प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या नोटीसा तात्काळ मागे घेणे, गरजेपोटी बांधलेल्या घरांना संरक्षण देणेबाबत, लोकहिताची योजना राबविणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.उद्योग मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) मा.मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हद्दीतील ९० अनधिकृत इमारती निष्कासित करण्याचे आदेश दिले असून त्यानुसार संबंधितांना नोटीसा देण्याची व निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) होय.
(४) व (५) दिघा, नवी मुंबई येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या जमिनीवरील अनधिकृत इमारती निष्कासित करण्याची कारवाई मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार करण्यात येत आहे. अनधिकृत इमारतींना /घरांना संरक्षण देण्याचे धोरण नाही.

-----------------

## औरंगाबाद येडशी महामार्गाच्या रूंदीकरणासाठी झाडांची तोड करण्यात आल्याबाबत

**(७९) * १४०९१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एक झाड तोडण्यापूर्वी तीन झाडे लावा असा नियम असताना नियमांचे पालन न करता औरंगाबाद येडशी महामार्गाच्या रूंदीकरणात तब्बल दहा हजार झाडांची तोड करण्याचा प्रकार समोर आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढी मोठी नैसर्गिक हानी होऊन अद्यापपर्यंत विभागाने एकही झाड लावले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद, सोलापूर रस्त्याचे रूंदीकरणात जेवढी झाडे तोडण्यात येतील त्याच्या तीनपट झाडे रस्ता पूर्ण होताच त्याच्या बाजूने लावण्यात येतील असे प्राधिकरणाचे परियोजना निर्देशक यु.जे.चामरगोजे यांनी सांगितले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वरील येडशी ते औरंगाबाद (कि.मी. १००/००० ते कि.मी.२९०/२००) या लांबीतील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत हाती घेण्यात आलेले आहे. सदर रस्त्याच्या चौपदरीकरणात येणारी १२१८३ झाडे तोडण्याची परवानगी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत प्राप्त करुन आजमितीस ५०५६ झाडे तोडण्यात आलेली आहेत, व उर्वरित झाडे तोडण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीनुसार तोडलेल्या एका झाडाच्या बदल्यात तीन झाडे (१:३ प्रमाणात) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे उपलब्ध करुन दिलेल्या जमिनीवर लावण्यात येतील, तसेच भारत सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या हरीत धोरण (Green Policy) अनुसार काही झाडे स्थलांतरीत करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

-----------------

### राज्यात डोक्यावरून मैला वाहून नेण्याच्या पध्दतीचे निर्मुलन करण्याबाबत

**(८०) * १४१८७ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अरुणकाका जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डोक्यावरून मैला वाहून नेण्याच्या पध्दतीचे निमुर्लन मार्च, २०१६ पर्यंत करणार असल्याची मा. मुख्यमंत्री यांनी घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोषणेनुसार शासनाने निर्णय घेवून ही अमानूष प्रथा निमुर्लनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे, तथापि राज्यात डोक्यावरुन मैला वाहुन नेण्याच्या पध्दतीचे निर्मुलन मार्च-२०१६ पर्यंत करणार असल्याची मा.मुख्यमंत्री यांनी घोषणा केलेली नसून "की रिझल्ट एरिया" (KRA) च्या बैठकीच्या वेळी मा.मुख्यमंत्री यांनी संबंधित विभागांना सदर प्रकरणी निर्देश दिले होते, हे खरे आहे. तसेच हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे पुनर्वसन करण्याबाबतचा अधिनियम २०१३ च्या अनुषंगाने फेरसर्व्हेक्षण करण्याचा दिनांक १६.१०.२०१४ व दि.०७.०८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सूचना दिलेल्या आहेत.

-----------------

## शेगांव (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची धान्य साठवणुक योजना सुरु ठेवण्याबाबत

**(८१) * १२५८८ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव (जि.बुलडाणा) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची धान्य साठवणूक योजना अंदाजे मागील ५० ते ६० वर्षापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परीसरातील सर्व शेतकरी त्यांच्या शेती मालाची या केंद्रात साठवणूक करीत असून यावर शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज उपलब्ध होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या धान्याला योग्य भाव मिळवता येतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू केंद्र हे जास्त उत्पन्न मिळवून देणारे असून नेहमीच नफ्यात असल्याने शेगांव केंद्रास अमरावती विभागातून सर्वोत्कृष्ट वखार केंद्र म्हणून सन २०१४-१५ मध्ये पारितोषिक सुध्दा मिळाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी पासून शेगांव केंद्राने नवीन कृषी माल साठवणूक करणे बंद करण्याची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

खाजगी मालकीच्या भाडेपट्ट्याच्या जागेत योजना सुरु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०१५ रोजी शेगांव वखार केंद्राच्या एकूण साठवणूक क्षमतेपैकी २५% साठवणूक क्षमता ही व्यापारी/ उद्योजक, तर १८% साठवणूक क्षमता शेतकऱ्यांच्या मालाच्या साठवणूकीस वापरात होती. तर उर्वरीत ५७% रिकामी होती.

(३) हे खरे नाही.

सर्वोत्कृष्ट वखार केंद्र हे पारितोषिक शेगांव वखार केंद्रास वन २०१४-१५ या वर्षासाठी दिलेले आहे. सर्वोत्कृष्ट वखार केंद्र हे पारितोषिक केंद्रावरील व्यवस्थापन पध्दतीसाठी कर्मचाऱ्यांना दिले जाते. त्याचा नफ्याशी संबंध नाही.

(४) नवीन कृषि माल साठवणूक करणे बंद करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. जागा मालकाने वारंवार गैरवाजवी (सध्याच्या ७५%) भाडेवाढ मागणी केलेली आहे. भाडेवाढ केली नाही तर गोदामे रिकामे करुन परत करण्याबाबत दिनांक ०७.११.१४ च्या पत्रान्वये नोटीस दिलेली आहे.

२. महामंडळाने यापूर्वी दोनवेळा दिनांक ०१.११.१२ व दिनांक ०१.११.१३ यावेळी भाडेवाढ दिली आहे. मात्र गोदाम मालकाची दरवर्षी भाडे वाढ मागणी मान्य करणे अशक्य आहे.

३. सदर गोदामांचे बांधकाम अत्यंत जुने झालेले असून गोदामामध्ये ओलावा येतो.

४. आस्थापना खर्चात होणारी वाढ, कर्मचारी वर्ग व इतर खर्च भाडेवाढ व मिळणारे उत्पन्न यांचा विचार करता सदर वखार केंद्र तोट्यात जात आहे.

-----------------

**अनुसूचित जमाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याबाबत**

**(८२) * १२९७० श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००५ पासून अनुसूचित जमाती आयोग कार्यरत असून सदर आयोगास वैधानिक दर्जा नसल्यामुळे आयोगाच्या शिफारशी शासनाच्या विविध विभागांवर बंधनकारक नसल्यामुळे आयोगास संबंधित मागासवर्गीय व्यक्तींना सक्षमपणे न्याय देणे शक्य होत नाही तसेच त्यामुळे आयोगास वैधानिक दर्जा देण्यात यावा अशी लेखी विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आयोगाकडे तक्रार करणा-या मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना योग्य तो न्याय देणे शक्य व्हावे यासाठी आयोगास वैधानिक दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व या संदर्भातील निर्णय साधारणतः किती कालावधीत घेण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

(२) यासंदर्भात दि.१७/६/२०१५ रोजी शासन स्तरावर बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत दिलेल्या निदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. तसेच याबाबत विधी व न्याय विभाग तसेच आदिवासी विकास विभागाच्या सहाय्याने कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हा शालेय कर्मचारी पत संस्थेतील गैरव्यवहाराबाबत**

**(८३) * १३०७६ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा शालेय कर्मचारी पतसंस्थेतील विविध ठरावांवर संचालकांच्या बनावट स्वाक्षरी स्कॅन करुन बनावट कर्ज प्रकरणांना मंजुरी देण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत संस्थेतील एका शिक्षकानेच आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार केली असुन या तक्रारीबाबत चौकशी करून आवश्यक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) श्री. नारायण डांगे यांनी दि. २४.०७.२०१५ रोजी आर्थिक गुन्हे शाखा यवतमाळ यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या अहवालानुसार सदर प्रकरणी कोणताही अफरातफर व फसवणुकीचा प्रकार निष्पन्न झाला नसल्याने कोणावरही कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या भूखंड खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(८४) * १३८८७ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया यांच्या दिनांक ३ मार्च, २०१५ च्या चौकशी अहवालानुसार गोंदिया डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटिव्ह बँक लि.गोंदिया च्या भूखंड खरेदी / इमारत निर्माण मध्ये अव्यवहार्यता झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटिव्ह शाखा अर्जुनी/मोरगांव येथे रु. ६,२३,५०,२२१/- इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे वार्षिक ताळेबंद पत्रकावरुन दिसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आमदार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.
अर्जुनी-मोरगाव शाखेमध्ये रुपये ७,७१,०५,९१९/- रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) वरील प्रकरणी चौकशी करण्याबाबत स्थानीक लोकप्रतीनिधींनी शासनास निवेदन सादर केले आहे.
(४) अर्जुनी-मोरगाव शाखेतील शाखा व्यवस्थापक, सहलेखापाल, रोखपाल यांनी रु. १,९४,००,०००/- चा गैरव्यवहार केल्याबाबत दि. २२/०२/२०१२ रोजी अर्जुनी मोरगाव पोलीस स्टेशनमध्ये तक्रार [FIR] नोंदविली आहे. बँकेने तीनही आरोपींना निलंबित केले आहे. पोलीस विभागाने आरोपींना अटक केली होती व त्यांचे विरुध्द न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी दि. २३/०३/२०१२ रोजी अर्जुनी मोरगांव शाखेच्या फेरलेखापरीक्षणाचे आदेश दिले आहेत. सन २००६ ते २००८ या कालावधीचे फेरलेखापरीक्षण पुर्ण झाले आहे. सन २००८ ते २०११ या कालावधीचे फेरलेखापरीक्षणाचे काम सुरु आहे.
(५) उचित कार्यवाही करण्यात आली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसंतराव नाईक शेतकरी स्वालंबन मिशनच्या अहवालातील शिफारशींबाबत**

**(८५) * ११४४८ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुष्काळाचा सामना करणाऱ्या मराठवाडा व पश्चिम विदर्भाच्या १४ जिल्ह्यातील ६० लाख शेतकऱ्यांसाठी पंचवार्षिक तत्वावर नवीन पीक कर्ज पॅटर्न लागू करण्यात यावा असा अहवाल वसंतराव नाईक शेतकरी स्वालंबन मिशनने शासनाला दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ रोजी सादर केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे,
(२) शासन स्तरावर कार्यवाही चालु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### घिवली (ता.जि.पालघर) गावाच्या समुद्र किनारी धुप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(८६) * १३९४४ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घिवली (ता.जि.पालघर) गावाच्या समुद्र किनारी धुप प्रतिबंधक बंधाऱ्याचे ४५० चौरस मीटर लांबीचे काम सन २००९-१० या कालावधीत पूर्ण झाले असून उर्वरित ७०० चौरस मीटर लांबीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घिवली गावाच्या पश्चिम, उत्तर व पूर्व या तीन्ही दिशेने समुद्राचे पाणी येत असल्यामुळे गावाला धोका निर्माण झाल्याने सदरहू ७०० चौ.मी. लांबीच्या कामास शासनस्तरावर निधी मंजूर करुन काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
सन २००९-१० मध्ये २०० मीटर लांबीचा व सन २०१०-११ मध्ये २५० मीटर लांबीचा बंधारा पूर्ण करण्यात आला आहे.
(२) सदर अपूर्ण लांबीमुळे गावाला धोका निर्माण झालेला नाही, तथापि भविष्यकाळात धोका निर्माण होऊ नये म्हणून सदर ठिकाणी ७०० मीटर लांबीचा धुप प्रतिबंधक बंधारा बांधणे आवश्यक आहे. निधी उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत

**(८७) * १३१३७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे गतवर्षी ४ साखर कारखान्यांनी जवळपास २२ लाख मे. टन ऊसाचे गाळप केले मात्र यावर्षी तालुक्यात चारा आणि पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असल्यामुळे सध्याच्या हंगामात ९६०० हेक्टर उसाची नोंद झाली असून माण नदी व उजनी कालव्याच्या परिसरातील जवळपास सात हजार एकरावरील ऊस जळण्याच्या मार्गावर असल्यामुळे ऊस बागायतदार अडचणीत सापडले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील कारखान्यांसह ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मंगळवेढा तालुक्यातील ४ साखर कारखान्यांनी गतवर्षी २१,४०,६९२ टन ऊसाचे गाळप केले असून चालू वर्षी ९४०१ हेक्टर ऊस क्षेत्राची नोंद झालेली आहे. मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि. सोलापूर) येथील माण नदी व उजनी कालव्याच्या परिसरात जवळपास सात हजार एकरावरील ऊस जळण्याच्या मार्गावर असल्याबाबतच्या परिस्थितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अपंगत्व प्रमाणपत्रांची संगणकीय तपासणी करण्याबाबत**

**(८८) * १२९२५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण, रोजगार किंवा अपंगांसाठी लागू असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अनेकांनी बोगस अपंगत्व स्वीकारले असून या बोगस अपंगांचे यापूर्वीचे अपंगत्व प्रमाणपत्र रद्द करून नव्याने ऑनलाईन नोंदणी करण्याचे आदेश अपंग आयुक्तालयाने दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग आयुक्तालयाच्या या आदेशानुसार संगणकीय तपासणीची पध्दत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही.

अपंग अधिनियम, १९९५ अन्वये किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगात्वाचे सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असल्यास संबंधित व्यक्तीस शिक्षण, रोजगार किंवा अपंगांसाठी लागू असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येतो. राज्यात बोगस अपंगत्वाची प्रमाणपत्र घेऊन अशा योजनांचा कोणी गैर फायदा घेऊ नये तसेच अपंगत्वाचे प्रमाणपत्र अधिक विश्वासार्ह व बिनचूक होण्यासाठी SADM (Software Assistance of Disabillity in Maharashtra) या संगणकीय सॉफ्टवेअर प्रणालीचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार अपंगांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वानिवडे-मोंड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील नदी पात्रावर पुल बांधण्याबाबत**

**(८९) * १४११० अॅड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानिवडे-मोंड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील वाहणाऱ्या नदी पात्रावर पुल बांधण्यात यावा, अशी मागणी अनेक वर्षांपासून शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत देवगड तालुक्यातील सर्व ग्रामस्थांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१३ व दिनांक १९ सप्टेंबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम तात्काळ घेण्यात येईल, उपोषणकर्त्यांनी उपोषण स्थगित करावे असे पत्र उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देवगड यांनी अध्यक्ष, सिंध सेवा प्रबोधिनी या संस्थेमार्फत समस्त ग्रामस्थांना दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असे असतानाही सदर पुलाचे काम सुरु करण्यात आले नसल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे व सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. तथापि, उक्त मागणीबाबत अध्यक्ष, सिंधू सेवा प्रबोधिनी यांनी दिनांक १९/०९/२०१५ रोजी खाडीत उतरुन लाक्षणिक उपोषण करण्याबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कणकवली यांना निवेदन दिले आहे.

(३) नाही. उप विभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, देवगड यांनी दि.१८/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर काम शासनाने मंजूरी देवून निधी उपलब्ध केल्यावर हाती घेण्यात येईल, तरी उपोषण स्थगित करावे असे संबंधितांना कळविले आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही. प्रश्नांकित काम मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) येथील नेल्सन मंडेला निवासी आश्रमशाळेची मान्यता रद्द केल्याबाबत**

**(९०) * १३६२७ श्री.जयंत पाटील, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठाणे (ता.रोहा, जि.रायगड) येथील नागसेन एज्युकेशन सोसायटी अॅण्ड बुध्दिस्ट कल्चरल ट्रस्ट मुंबई संचलित नेल्सन मंडेला निवासी आश्रमशाळा सन २०१५-१६ चे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर सदर शाळेची सुमारे दोन महिन्यांनी मान्यता रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या माध्यमिक शाळेत एकूण किती विद्यार्थी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात दाखल झाले होते,

(३) असल्यास, या शाळेची मान्यता रद्द झाल्याने या शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पुढील भविष्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

नागसेन एज्युकेशन सोसायटी अॅण्ड बुध्दिस्ट कल्चरल ट्रस्ट, मुंबई संचलितनेल्सन मंडेला माध्यमिक आश्रमशाळेची मान्यता व्यवस्थापनातील त्रुटींमुळे संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांनी दिनांक २९.०६.२०१४ रोजी रद्द केली होती. सदर आदेशाविरुध्द संस्थेने शासनाकडे अपील केल्यानंतर शासनाने संस्थेस त्रुटींची पूर्तता करण्यासाठी ६ महिन्यांची संधी दिली. तथापि, संस्थेने व्यवस्थापनाच्या कामकाजात सुधारणा न केल्याने शासनाने सदर आश्रमशाळहेची मान्यता सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून रद्द केली आहे

(२) सदर माध्यमिक आश्रमशाळेत सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात फक्त १२ प्रवेशित विद्यार्थी होते.

(३) सदर माध्यमिक आश्रमशाळेत सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात प्रवेशित झालेल्या १२ विद्यार्थ्यांचे नजीकच्या शाळेमध्ये समायोजन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजूरा ते भायेगांव व राजूरा ते जाहूर (ता.मुखेड, जि.नांदेड) या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(९१) * ११३५६ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मुंखे तालुक्यात राजूरा ते भायेगांव मार्गे देगलूर, हरग्याळ, गोणेगांव, राजूरा ते जाहूर मार्गे बाऱ्हाळी तडग्वेल मार्गे देगलूर या मार्गावर खड्डे पडल्याने प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्यावर अर्थसंकल्पातून ३ कामे मंजूर असून कार्यारंभ आदेश दिले असून लवकरच कामे सुरु करण्यात येत आहेत व रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी योजनेतर कार्यक्रमांतर्गत दुरुस्तीची कामे प्रगतीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सातारा येथील जिजामाता बँकेत झालेला गैरव्यवहार**

**(९२) * ११४९२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथे जिजामाता बँकेत झालेल्या कथित अनियमितांची चौकशी करण्यासाठी सहकार जिल्हा उपनिबंधक यांनी चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून या चौकशीत आठ व्यवहारांची चौकशी होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

(२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांच्या दि. २४.८.२०१५ च्या आदेशान्वये सहाय्यक निबंधक, मेंढा ता.जावली यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८८, ९५ मधील तरतुदीन्वये जबाबदार व्यक्तींची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दि. ०३.११.२०१५ व दि. ०९.११.२०१५ रोजी दिले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेली घटनास्थळे आणि महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देण्याबाबत**

**(९३) * १४१५३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेली घटनास्थळे आणि महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देण्याबरोबरच त्यांचा विकास करण्याचेही शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहेत,
(३) तद्‌नुसार, कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) व (३) या संबंधीचा निर्णय दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आल असून, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील टोलबाबत स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास गट समितीच्या अहवालाबाबत**

**(९४) * १३७२३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोल विषयक बाबीचा अभ्यास करण्यासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान श्री.सी.पी.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालानुसार काय शिफारशी करण्यात आल्या आहेत व त्यांच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

(२) होय,

(३) व (४) केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याचे पथकर धोरण तयार करणे, पथकर नाक्यावरील वाहतुक कोंडी कमी करणे, पथकर नाके बंद करणे, हलक्या प्रकारच्या वाहनांवर पथकरातून सूट देणे व इ-टॅगची पध्दत अवलंबणे इ.शिफारशी केलेल्या आहेत.

राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर पथकर धोरण दिनांक ३१.७.२०१४ रोजी निर्गमित केले आहे. शिफारशीच्या अनुषंगाने पथकर नाक्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विखुरलेल्या (staggered) पध्दतीचे नाके उभारणे अथवा मार्गिकांची संख्या वाढविण्यात येत आहेत. दिनाक ०१.०६.२०१५ पासून १० प्रकल्पावरील पथकर वसुली बंद करण्यात आली आहे व ३१ प्रकल्पावरील पथकर स्थानकांवर हलकी वाहने, महाराष्ट्र शासनाच्या प्रवासी बसेस तसेच स्कूल बसेस यांना पथकरातून सूट देण्यात आलेली आहे. राज्यात काही ठिकाणी इ-टॅग पध्दत अवलंबिली असून त्यास मिळणाऱ्या प्रतिसादाचा विचार करुन आवश्यकतेनुसार टप्याटप्याने इ-टॅगची पध्दत अवलंबण्याचे नियोजन/ नियोजित आहे.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**नागपूर.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.